बुधवार, २५ जानेवारी २०२३
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक १८८
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग
बेकायदेशीर गर्भपात करणाऱ्या रुग्णालयांवर होणार कारवाई/२
बोरघाटात अपघात रोखण्यासाठी यंत्रणा ॲक्शन मोडवर/५
कोकण परिक्षेत्रीय कबड्डी संघाने पटकाविले विजेतेपद/८

## सहकारासंदर्भात शिंदे-फडणवीसांची ना. शाहांसोबत बैठक



**नवी दिल्ली** : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि. २४) राजधानी दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्री व सहकारमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या वेळी सहकार क्षेत्राविषयी चर्चा झाली. दिल्लीमधील नॉर्थ ब्लॉक येथील केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्या कार्यालयात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि भाजपचे महाराष्ट्रातील नेते एकत्र आले होते. सहकार क्षेत्रासंबंधीच्या या बैठकीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे आदी उपस्थित होते. या बैठकीबाबत माहिती देताना मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले की, सहकार क्षेत्रात नवीन सुधारणा, योजना आणण्याबाबत चर्चा झाली. यातून महाराष्ट्रासाठी फायदा होईल.

# मला तुरुंगात टाकण्याचा डाव होता

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा 'मविआ'वर गंभीर आरोप

**मुंबई : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी सरकारच्या काळात मला तुरुंगात टाकण्याचा डाव होता, असा गंभीर आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. एवढेच नाही तर उद्धव ठाकरेंनीच मला 'मातोश्री'चे दरवाजे बंद केले, असेही त्यांनी म्हटले आहे. एका वृत्तवाहिनीच्या मुलाखतीत त्यांनी हा गौप्यस्फोट केला.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याबद्दल एका प्रश्नाला उत्तर देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, माझ्याकडून कुठलेही वैर नव्हते, पण 'मातोश्री'चे दरवाजे मला उद्धव ठाकरेंनी बंद केले. पाच वर्षे आम्ही सत्तेत होतो, तरीही ते असे वागले. मी राजकीय वैर ठेवणारा माणूस नाही, मात्र अडीच वर्षांचे महाविकास आघाडी



सरकार असताना माझ्यावर केसेस टाकण्याचे, फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे, काहीही करून मला तुरुंगात टाकण्याचे टार्गेटच त्या वेळी पोलीस आयुक्त संजय पांडे यांना दिले होते. मी काहीही केले नव्हते. त्यामुळे मला संजय पांडे अडकवू शकले नाहीत. मला तुरुंगात टाकण्याचे कुठलेही प्रयत्न सफल झाले नाहीत.


माझ्याकडून कुठलीही कटुता आजही नाही. राजकीयदृष्ट्या मी त्यांचा (उद्धव ठाकरे) विरोधक आहे, पण व्यक्तिगत पातळीवर काहीही वैर नाही, असे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. रश्मी वहिनी मला परवा एका कार्यक्रमात भेटल्या होत्या. तेव्हा मी म्हटले की, उद्धवजींना नमस्कार सांगा, कारण मी त्या वृत्तीचा नाही, असेही फडणवीस यांनी या वेळी म्हटले.

# कळंबोलीतील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृहासाठी सरकारकडून पाच कोटींचा निधी

### ▮ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्याला यश

**पनवेल : वार्ताहर**





कळंबोली वसाहतीत पनवेल महापालिकेच्या वतीने राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने भव्यदिव्य सभागृह उभारण्यात येणार आहे. यासाठी राज्य सरकारने पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. याबाबत अध्यादेशसुद्धा काढण्यात आला आहे.

कळंबोली सेक्टर ११ येथे उभारण्यात येणाऱ्या या वास्तूचा संकल्पीय आराखडा तयार करण्यात आला आहे. त्याला पनवेल महापालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरीसुद्धा मिळाली आहे. ही पथदर्शी वास्तू असावी यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निधीची मागणी केली होती. विशेष म्हणजे याकरिता पाच कोटी रुपये राज्य सरकारने मंजूर केले आहेत. महापालिका मूलभूत सोयीसुविधा विकास विशेष तरतूद या योजनेंतर्गत हा निधी उपलब्ध होणार आहे. माजी महिला व बालकल्याण सभापती मोनिका प्रकाश महानवर यांच्या संकल्पपूर्तीच्या दिशेने ही वाटचाल आहे.

धनगर समाजातील मोठ्या संख्येने कुटुंब नोकरी-व्यवसायानिमित्त कळंबोलीत स्थायिक झाले आहेत. लोकवस्तीचा विचार करता त्यांना विविध धार्मिक, सामाजिक, आध्यात्मिक तसेच वैयक्तिक कार्यक्रम करायचे असल्यास त्यांच्याकडे जागेचा अभाव आहे. खासगी हॉलमध्ये कार्यक्रम करणे खिशाला परवडणारे नाही. त्यामुळे येथील सर्वसामान्य लोकांसाठी एक हक्काचे सभागृह असावे अशा प्रकारची मागणी होत होती. राजमाता अहिल्यादेवी होळकर या सर्वांच्या श्रद्धास्थान आहेत. त्यांनी देशभरात अनेक मंदिरे उभारली, गोरगरिबांसाठी पुण्याचे काम केले. (पान २ वर..)

### असा आहे संकल्पीय आराखडा

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृहाची जी प्लस टू इमारत बांधण्यात येणार आहे. प्रस्तावित वास्तूमध्ये तळमजल्यावर पार्किंग, पहिल्या माळ्यावर ३७ बाय ७१ चौरस फुटाचा बहुउद्देशीय हॉल असणार आहे. कार्यालय आणि स्वच्छतागृहाची सोय येथे असणार आहे. दुसऱ्या माळ्यावर दोन हजार चौरस फुटाची अभ्यासिका आणि १७७१ चौरस फूट क्षेत्रफळावर वाचनालय बांधण्यात येणार आहे. या इमारतीचे एकूण बांधकाम क्षेत्रफळ १८५६५.५२ चौरस फूट इतके असणार आहे.

*पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने पनवेल महापालिकेतर्फे कळंबोलीत उभ्या राहणाऱ्या प्रस्तावित सभागृहासाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता होती. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. सरकारकडून पाच कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. याबद्दल आभार!*

*-मोनिका महानवर, माजी सभापती, पनवेल मनपा*

### शालेय विद्यार्थ्यांना स्वखर्चातून शूज व सॉक्सचे वितरण

# विद्यार्थ्यांनी थोर व्यक्तींच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी -लोकनेते रामशेठ ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांनी थोर व्यक्तींच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी व आपले जीवन यशस्वी करावे, असे आवाहन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मंगळवारी (दि. २४) केले.

'रयत'चे गव्हाण कोपर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज तसेच जेबीएसपी संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तु. ना. घरत ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वतीने आठ लाख ७० हजार रुपये किमतीच्या शालेय शूज व सॉक्सचे वितरण विद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले. त्या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर अध्यक्षस्थानावरून बोलत होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. (पान २ वर..)

## पुण्यातील दौंडमध्ये सात जणांची सामुहिक आत्महत्या

**पुणे : प्रतिनिधी**

नगर जिल्ह्याच्या पारनेर तालुक्यातील निघोज येथील कुटुंबातील सात जणांनी आत्महत्या केली असल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. पती, पत्नी, मुलगी आणि जावई यांच्यासह तीन मुलांचे मृतदेह काही दिवसांच्या अंतराने भीमा नदीत सापडले आहेत. पुणे जिल्ह्यातील दौंडमध्ये ही घडना घडली आहे.

दौंड पोलीस ही सामुहिक आत्महत्या आहे की घातपात याचा तपास करीत आहेत. मृतदेहांचा शवविच्छेदन अहवाल आल्यावर यावर अधिक प्रकाश पडू शकेल.

## निवडक

### राजधानी दिल्लीत भूकंपाचे धक्के; नागरिकांमध्ये भीती

**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीसह परिसरात मंगळवारी (दि. २४) दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. सुदैवाने यात कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाल्याचे वृत्त समोर आलेले नाही. या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ५.८ इतकी नोंदली गेली आहे. नेपाळमधील कालिका येथे भूकंपाचे केंद्र असल्याचे सांगण्यात आले आहे.

### प्रजासत्ताक दिनी मुंबईवर हवाई हल्ल्याचा धोका

**मुंबई** : येत्या २६ जानेवारी रोजी मुंबईवर हवाई हल्ला केला जाऊ शकतो, ही बाब लक्षात शहरातील सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. संभाव्य हल्ला लक्षात घेता मुंबई पोलिसांकडून दादरच्या शिवाजी पार्कला नो फ्लाय झोन घोषित करण्यात आले आहे. दुसरीकडे प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत पोलिसांनी सुरक्षेच्या कारणास्तव उपपारंपरिक हवाई उड्डाणांवर बंदी घातली आहे.

# महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या प्रचारार्थ आज पनवेलमध्ये स्नेहमेळावा

### ■ मुख्याध्यापक व शिक्षकांशी साधणार संवाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण विभाग शिक्षक मतदारसंघातील भाजप, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय, शिक्षक परिषद व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर हात्रे त्यांच्या प्रचारार्थ पनवेलमधील विरुपाक्ष मंगल कार्यालयात बुधवारी (दि. २५) दुपारी १२.३० वाजता स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला आहे. या वेळी म्हात्रे सर मुख्याध्यापक व शिक्षक यांच्याशी संवाद साधणार आहेत.

या मेळाव्यास प्रमुख मान्यवर म्हणून राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार महेंद्र थोरवे यांची उपस्थिती असणार आहे.

कोकण विभाग शिक्षक मतदारसंघातील निवडणुकीत ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. ते स्वत: शिक्षक असून मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या अडी-अडचणी दूर करण्यासाठी वेळोवेळी धाव घेतलेली आहे. त्यामुळे ज्ञानेश्वर म्हात्रे यांना वाढता प्रतिसाद मिळत आहे.

# शिक्षकांचा आमदार शिक्षकच पाहिजे -आमदार गणेश नाईक

### महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांना विजयी करण्याचे आवाहन



**नवी मुंबई : बातमीदार**

शिक्षकांसाठी शिक्षकच उमेदवार आमदार झाला पाहिजे. त्यामुळे खऱ्या अर्थाने शिक्षकांच्या व्यथा जाणून घेत त्या सोडविण्यासाठी सातत्याने काम करणारे कोकण विभाग शिक्षक मतदारसंघातील भाजप, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय, शिक्षक परिषद व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांना विजयी करा, असे आवाहन माजी मंत्री व विद्यमान आमदार गणेश नाईक यांनी मंगळवारी (दि. २४) केले. ते नवी मुंबईत आयोजित प्रचार सभेत बोलत होते.

महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या प्रचारार्थ नवी मुंबई भाजपच्या वतीने कोपरखैरणे येथील रा. फ. नाईक विद्यालयात सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेस माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे, भाजप समन्वयक प्रा. वर्षा भोसले यांच्यासह महायुतीचे ठाणे जिल्ह्यातील पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक व मुख्याध्यापक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्रातील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार शिक्षकवर्ग व संबंधित घटकांचे प्रश्न सोडवित आहे, असे सांगत आमदार गणेश नाईक यांनी (पान २ वर..)

### मला विजयाची खात्री -ज्ञानेश्वर म्हात्रे

२०१७च्या कोकण शिक्षक मतदारसंघ निवडणुकीत मतविभाजनाचा फायदा मिळवून विरोधी पक्षाचा उमेदवार निवडून आला होता, मात्र मागील सहा वर्षे या आमदाराने शिक्षक हिताचे कोणतेच काम केले नाही अशी शिक्षकवर्गाची तक्रार आहे. यंदाच्या निवडणुकीत आम्ही सर्व एकजूट असून शिक्षक असलेला उमेदवारच आमदार म्हणून निवडून देण्याचा निर्धार शिक्षकांनी केलेला आहे. त्यामुळे मला विजयाची खात्री आहे, अशा भावना महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी या वेळी व्यक्त केल्या.

# रातवड शाळेच्या आवारात भाजीपाला लागवड

### विद्यालयाकडून विद्यार्थ्यांना शेती व्यवसायाचे धडे



(छाया : सलीम शेख)

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील रातवड येथील छत्रपती शिक्षण मंडळ संचालित माध्यमिक विद्यामंदिरातील विद्यार्थ्यांनी शाळा उपक्रमांतर्गत भाजीपाला लागवड केली आहे. याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

विविध सामाजिक, सांस्कृतिक व ज्ञानरचनावादी, शैक्षणिक उपक्रम राबविणाऱ्या रातवड विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शालेय परिसरात भाजीपाला लागवड केली आहे. विद्यालयाने शालेय परिसरात असलेल्या जागेचा उपयोग करून भाजीपाला लागवडीचा प्रयोग यापूर्वीही यशस्वी केला आहे. या यशस्वी भाजी उत्पादनातून प्रेरणा घेऊन विद्यालयाचे मुख्याध्यापक एम. एस. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालय परिसरात विविध रोपांची लागवड करण्यात आली. यामध्ये वांगी, टोमॅटो, कोथिंबीरसह केळीचे उत्पादन घेतले. या रोपांची योग्य ती निगा राखून देखभाल करण्यात येते.

भाजीपाला उत्पादनातून विद्यार्थ्यांच्या श्रमाला फळ आले असून उत्पादन सुरू झाले आहे. एका वेळी दोन ते चार किलो भाजी उत्पादन होत आहे. हा भाजीपाला विद्यार्थ्यांना पूरक पोषण आहार म्हणून दिला जातो. उपक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक बी. के. काळे व विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली. त्यांना शिपाई प्रदीप लांगी यांनी साहाय्य केले. जास्तीचा होणारा भाजीपाला विकला जात असून यातून विद्यार्थ्यांना विक्री कौशल्य आत्मसात होत आहेत.

**भाजीपाला लावताना विद्यार्थ्यांना शेतीचा अनुभव मिळावा हा हेतू होता. आता उत्पादन मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला आहे. पूरक आहार म्हणून हा भाजीपाला आम्ही विद्यार्थ्यांना देतो.**

**-बी. के. काळे, शिक्षक**

**भाजीपाला लावताना, निगा राखताना, काम करताना आम्हाला आनंद मिळतो. विविध रोप लागवड कशी करायची हे यातून आम्ही शिकलो. यासाठी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.**

**-शुभम उभारे, विद्यार्थी**

## सरकारी कर्मचाऱ्यांच्या विमा योजना रकमेत वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. शासकीय कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या विमा योजनेच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे.

सरकारी कर्मचाऱ्यांना आता विमा रक्कम सरसकट १० लाख रुपयांऐवजी १५ ते २५ लाख रुपये मिळणार आहे. गट अ अधिकाऱ्यांना २५ लाख, तर गट ब अधिकाऱ्यांना २० लाख रुपये मिळणार आहेत. गट क व ड कर्मचाऱ्यांना १५ लाख रुपये मिळणार आहेत. अपघातात अपंगत्व आल्यास किंवा मृत्यू झाल्यास ही मदत मिळणार आहे.

राज्यात सत्तापरिवर्तन झाल्यानंतर नवे सरकार जनतेसाठी जोमाने कार्यरत असून दिलासा देत आहे.

## बिकानेर स्वीट्स कॉर्नरचे उद्घाटन



**पनवेल : शहरातील रूपाली चौकात अस्पायर प्राईड बिल्डींगमध्ये असलेल्या बिकानेर स्वीट्स कॉर्नर या दुकानाचे नूतनीकरण करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते मंगळवारी झाले. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, भाजपचे शहर खजिनदार संजय जैन, बिकानेर स्वीट्स कॉर्नरचे मालक भावेश सिरवी, महामंत्री देवारामजी, सिरवी समाज अध्यक्ष चेनारामजी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आदी उपस्थित होते. दरम्यान, मान्यवरांनी तेथे भेट देत शुभेच्छा दिल्या.** (वृत्त पान ३ वर..)

# प्रदूषण रोखण्यासाठी व्यवस्थापन आयोग स्थापन करा

## भाजप नेते आमदार ॲड. आशिष शेलार यांचे उपमुख्यमंत्र्यांना पत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

'मविआ' सरकारने बिल्डरांवर सवलतींची खैरात केल्यामुळे मुंबईत एकाच वेळी १५००हून अधिक बांधकामे सुरू झाली. यातील डेब्रिज, धूळ यामुळे मुंबईतील प्रदूषण एका भयंकर टप्प्यावर पोहचले. असा गंभीर आरोप करीत भाजप नेते आमदार ॲड. आशिष शेलार यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात करून दिल्लीच्या धर्तीवर मुंबईसाठी हवा गुणवत्ता व्यवस्थापन आयोग स्थापन करावा, अशी मागणी केली आहे.



आमदार ॲड. आशिष शेलार यांनी पत्रात म्हटले आहे की, यावर्षी हिवाळ्यात मुंबईतील हवेची पातळी प्रचंड घसरली व दिल्लीपेक्षा मुंबईतील हवा ही अत्यंत दुषित असल्याचे दिसून आले आहे. ज्यामुळे मुंबई भारतातील सर्वांत प्रदूषित शहरांमध्ये गणले गेले. मुंबईतील या सततच्या प्रदूषणामुळे त्रस्त असलेल्या ज्येष्ठ नागरिक, विविध सामाजिक संस्था आणि विविध शिष्टमंडळांनी निवेदने दिली असून याबाबत उपाययोजना करण्याची विनंती केली आहे.

मुंबईतील प्रदूषणात अचानक या वेळी झालेली वाढ ही बांधकामांमुळे झाली असून सुमारे ५० टक्के प्रदूषण हे बांधकामांमुळे होत आहे, असे मत काही तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. आघाडी सरकारच्या काळात बांधकाम व्यवसायाला सवलतींची खैरात करण्यात आली. त्यामुळे मुंबईत मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू झाली. त्याचा परिणाम हवा प्रदूषणावर झाला. मुंबईत १५००हून अधिक पुनर्विकासाचे बांधकाम प्रकल्प सुरू असून कोणत्याही प्रकारचे नियोजन न करता या कामांच्या परवानग्या देण्यात आल्याने त्याचा फटका वातावरणाला बसला.

गंभीर बाब म्हणजे वातावरणातील या बदलांचे मुंबई महापालिकेच्या शहर नियोजन अथवा आपत्कालीन विभागाकडे याबाबत नोंदी करून त्याचे वैज्ञानिक पृथ्थकरण करण्यात येत नाही, त्यामुळे याबाबत सर्वंकष विचार करणे आवश्यक आहे. मुंबई आणि एमएमआरमधील प्रदूषण एका भयंकर टप्प्यावर पोहचले असून याकडे वैज्ञानिकदृष्ट्या पाहणे आवश्यक आहे, तसेच याच्या मूळ कारणांचा शोध घेऊन उपाययोजना करणे आवश्यक आहेत.

आपल्या सरकारच्या काळात मुंबईला प्रदूषणमुक्त करण्यासाठी आपण कोस्टल रोड आणि मेट्रोसारखा प्रकल्प राबवून मोठी पावले उचलली आहेतच. आता अन्य काही महत्त्वाच्या बाबींकडे आपले लक्ष वेधत मी आपल्या समोर सविस्तर उपाययोजना करण्याची मागणी करीत आहे. याबाबत तातडीने कार्यवाही करून आपण मुंबईला प्रदूषणमुक्त करण्यासाठी तातडीने लक्ष द्यावे, असे आमदार ॲड. आशिष शेलार यांनी या पत्रात नमूद केले आहे.

# बेकायदेशीरित्या गर्भपात करणाऱ्या रुग्णालयांवर पनवेल मनपा करणार कारवाई

**पनवेल : प्रतिनिधी**

बेकायदेशीरित्या गर्भपात करणाऱ्या रुग्णालयांवर पनवेल महापालिकेच्या वतीने कडक कारवाई करण्यात येत आहे. नागरिकांनी सतर्क राहून महापालिका कार्यक्षेत्रात बेकायदेशीररित्या गर्भलिंग चाचणी होत असेल, त्याची माहिती महापालिकेस कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



महापालिका क्षेत्रातील कोणत्याही रूग्णालयात ०–५ वयोगटातील बालमृत्यू झाल्यास २४ तासांच्या आत महापालिकेस कळविणे बंधनकारक आहे. एमटीपी (मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेंग्नसी ॲक्ट) आणि पीसीपीएनडीटी (गर्भलिंग प्रतिबंध कायदा) समितीची बैठक मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि.२३) मुख्यालयात घेण्यात आली, तसेच चाईल्ड डेथ रिव्हू समितीची बैठक मंगळवार (दि. २४ ) रोजी मुख्यालयात माता बाल संगोपन अधिकारी डॉ. रेहाना मुजावर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

एमटीपी आणि पीसीपीएनडीटी बैठकीवेळी समिती सदस्य डॉ. गिरीश गुणे, माता बालसंगोपन अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, परिचारिका संगीता पाटील, प्रियांका पाटील, प्रफुल्ल घरत, सामाजिक कार्यकर्त्या जयश्री बर्फे, सुनिता शिंदे उपस्थित होते, तसेच चाईल्ड डेथ रिव्हू समितीच्या बैठकीस डॉ. जय भांडारकर, डॉ. संजय गुडे, डॉ. संतोष जायभाये, डॉ. पल्लवी चव्हाण उपस्थित होते. समितीची बैठक मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच घेण्यात आली.

या वेळी पनवेल महापालिका क्षेत्रातील रुग्णालये तसेच सोनोग्राफी सेंटर्समधील शासकीय नियमांची कठोर अंमलबजावणी करण्याबाबत चर्चा करण्यात आली. महापालिकेच्या वतीने गर्भलिंग चाचणीविषयक पोस्टर छापले असून ते संबंधित सर्व रुग्णालयात देण्यात आले आहेत.

एखाद्या सोनोग्राफी सेंटरची मुदत संपत आल्यास एक महिना आधीच सर्व कागदपत्रांची पूर्तता करून, त्या सोनोग्राफी सेंटरने पुढील मान्यतेसाठी महापालिकेकडे अर्ज करून मंजुरी घ्यावी, अन्यथा अशा मुदत संपूनही सुरूअसलेल्या सोनोग्राफी सेंटरवरती कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी सूचित केले आहे. महापालिका क्षेत्रातील कोणत्याही रूग्णालयात ०–५ वयोगटातील बालमृत्यू झाल्यास २४ तासांच्या आत महापालिकेस कळविणे बंधनकारक आहे. या विषयावर चाईल्ड डेथ रिव्ह्यू बैठकीत चर्चा करण्यात आली. तसे पत्र संबधित रूग्णालयांना देण्यात येणार असल्याचे समिती सदस्यांना या वेळी सांगण्यात आले.

# ओएनजीसी विद्यालयात चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांशी संवादाचा परीक्षा पे चर्चा कार्यक्रम शुक्रवारी (दि. २७) होणार आहे. या कार्यक्रमांतर्गत केंद्रीय विद्यालय ओएनजीसी, पनवेलमध्ये चित्रकला स्पर्धेचे सोमवारी (दि. २३) आयोजन करण्यात आले होते. केंद्रीय विद्यालयाचे प्राचार्य विजय कुमार गर्ग यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा घेण्यात आल्या.




'परिक्षा पे चर्चा' या उपक्रमाचे यावर्षीचे सहावे पर्व आहे. पनवेल क्षेत्रातील केंद्रीय विद्यालय, जवाहर नवोदय विद्यालय तसेच मान्यताप्राप्त शासकिय सीबीएसईई शाळांमधील नववी ते बारावीमधील सुमारे १०० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला. या स्पर्धेमध्ये सर्वोत्तम चित्र काढणाऱ्या पाच विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि एक्झाम वॉरिअर पुस्तके देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेसाठी सर्जीकल स्ट्राईक, पंतप्रधान जनसेवेच्या योजना, आंतरराष्ट्रीय योगदिन–मोदीजींनी वेधले जगाचे लक्ष, चुलीतल्या धुराच्या त्रासातून मुक्त महिला–मोदींचा संवेदनशील निर्णय, कोरोना लसीकरणात भारत नंबर १ असे विषय होते.

या स्पर्धेचे रोहन पवार, संजीव सोनपीपरे, सुजाता इंगोले यांनी परिक्षण केले, तसेच संजीव सोनपीपरे यांनी चित्रकलेतील विविध पैलू उलगडून त्याची माहिती दिली. केंद्रीय विद्यालयाचे प्राचार्य विजय कुमार गर्ग यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे बक्षीस देऊन गौरव केला. या स्पर्धेसाठी शिक्षिकाअंजू बीनू कुमार, चित्रकला शिक्षक किर्तीराज यांनी योगदान दिले.

### हे आहेत विजयी विद्यार्थी

**प्रथम क्रमांक पूर्वा सोंडुलकर (केंद्रीय विद्यालय ओएनजीसी, पनवेल), द्वितीय क्रमांक अतुल्या संजू (एपीजे. स्कूल, खारघर), तृतीय क्रमांक ईशान बटवाल (डी. ए. व्ही. पब्लिक स्कूल, पनवेल), चतुर्थ क्रमांक रेशा माकू (जवाहर नवोदय विद्यालय, निजामपूर), पाचवा क्रमांक (केंद्रीय विद्यालय एनएडी, करंजा)**

# वीजचोरांवर केली महावितरणने कारवाई



## भांडूप परिमंडळात वीजचोरीची ५,६७० प्रकरणे उघडकीस

**भांडूप : प्रतिनिधी**

महावितरणची थकबाकी वाढत असून भांडूप परिमंडलातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्न करून वीजबिल वसुलीवर भर देत आहेत. परिमंडलात १ एप्रिल २०२२ ते १५ जानेवारी २०२३पर्यंत एकूण १८ कोटी ४८ लाखांची वीजचोरीची ५,६७० प्रकरणे उघडकीस आली आहेत.

भांडूप परिमंडलात १ एप्रिल २०२२ ते १५ जानेवारी २०२३पर्यंत विद्युत कायदा २००३च्या कलम १३५नुसार भांडूप परिमंडलात ५०,१९,९४२ युनिटची नऊ कोटी ८८ लाखांची वीजचोरी उघडकीस आली आहे. यामध्ये ठाणे मंडल कार्यालयांतर्गत ६५४ प्रकरणात तीन कोटी २४ लाख, वाशी मंडल कार्यालयात १,०७५ प्रकरणात चार कोटी ५७ लाख व पेण मंडल कार्यालयात ६८६ प्रकरणात दोन कोटी सहा लाखांची वीजचोरी पकडली आहे. याशिवाय, विद्युत कायदा २००३च्या कलम १२६नुसार ठाणे मंडल कार्यालयात १७०१ प्रकरणात चार कोटी ११ लाख, वाशी मंडल कार्यालयात ६४६ प्रकरणात दोन कोटी ३२ लाख तर पेण मंडल कार्यालयात २६१ प्रकरणात ७३.४८ लाख असे एकूण २६०८ प्रकरणात सात कोटी १८ लाखांचा अनधिकृत विजेचा वापर आढळून आला आहे. याशिवाय आकडा टाकून वीजचोरी करण्याचे ६४७ प्रकरणे समोर आली आहेत. यामध्ये एक कोटी ४२ लाखांची वीजचोरी उघडकीस आली आहे. या मोहिमेत मुख्य अभियंता सुनील काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंता व लाईनस्टाफपर्यंत प्रत्येकाने विशेष मेहनत घेतली आहे.

ग्राहकांनी वापरलेल्या प्रत्येक युनिट वीजेचे पैसे प्रामाणिकपणे भरले पाहिजे. वीजचोरीसारख्या अनधिकृत वीजेचा वापर करणाऱ्या ग्राहकांनविरुद्ध विद्युत कायदा २००३ प्रमाणे कठोर कारवाई करण्यात येत असून अशा प्रकारच्या कारवाईत वीजचोरी करणाऱ्या ग्राहकांना दंड व कठोर शिक्षा होऊ शकते. ग्राहकांनी वीजचोरी सारख्या कृत्यापासून दूर राहावे, असे आवाहन मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी केले.

पान १ वरून

## विद्यार्थ्यांनी थोर व्यक्तींच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी -लोकनेते रामशेठ ठाकूर

दोन्ही विद्यालयांच्या इयत्ता अकरावी आणि बारावी (ज्युनिअर कॉलेज)च्या विद्यार्थ्यांनादेखील जून महिन्यात शूज व सॉक्सचे मोफत वितरण करण्यात येतील, असे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या कार्यक्रमात जाहीर केले.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेस प्रोत्साहन देण्यासाठी विविध पारितोषिकांसाठी १० लाख रुपयांचा धनादेश कायम ठेवीसाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सुपूर्द केल्याचे विद्यालयाच्या प्राचार्य साधना डोईफोडे यांनी प्रास्ताविकात सांगितले.

या वेळी उलवे नोड उत्तर भारतीय महिला मोर्चाच्या अर्चना मिश्रा यांनीही आपले मनोगत व्यक्त करताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या दातृत्व आणि कार्यकुशलतेबद्दल गौरवोद्‌गार काढले.

या कार्यक्रमास श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य तथा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन भार्गवशेठ ठाकूर, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष व माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, वसंतशेठ पाटील, वामनशेठ म्हात्रे, भाऊ भोईर, अंकुश ठाकूर, किशोर पाटील, कमलाकर देशमुख, रघुनाथ देशमुख, अर्चना मिश्रा, सुधीर ठाकूर, नामदेवशेठ ठाकूर, राजेंद्र देशमुख, मदन पाटील, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्राचार्य प्रणिता गोळे, विद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, पर्यवेक्षिका विशाखा मोहिते, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर व प्रमोद कोळी, लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे यांच्यासह शिक्षक व दोन्ही विद्यालयांचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर रंधवे यांनी केले.

## कळंबोलीतील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृहासाठी सरकारकडून पाच कोटींचा निधी

म्हणून त्यांना पुण्यश्लोक असे संबोधले जाते. उत्तम प्रशासकाबरोबर महिलांसाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. अहिल्यादेवींची जयंती आणि पुण्यतिथी साजरी करायची असेल तर पनवेल परिसरात भाडेतत्वावर जागा घ्यावी लागते. या सर्व गोष्टी पाहता त्यांच्या नावाने बहुउद्देशीय सभागृह बांधण्यात यावे, अशी मागणी माजी महिला व बालकल्याण सभापती मोनिका प्रकाश महानवर यांनी केली होती. त्यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावाही केला होता.

मोनिका महानवर यांच्या मागणीची दखल घेत कळंबोलीत सेक्टर ११ येथील ६सी/१ या सामाजिक आरक्षित भूखंडावर राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृह बांधण्याचा निर्णय महापालिकेने घेतला. सिडकोकडून हा भूखंड घेण्यात आला असून त्यासाठी एक कोटी १९ लाख नऊ हजार ६८२ रुपये प्राधिकरणाला देण्यात आले आहेत. त्याचा संकल्प आराखडा आणि नकाशे तयार करण्यात आले असून महासभेची मंजुरी मिळाली आहे.

या सभागृहाकरिता आर्थिक तरतूद करण्यात आली असली तरी अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर यांनी माजी महिला व बालकल्याण सभापती मोनिका महानवर यांच्यासमवेत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची काही दिवसांपूर्वी भेट घेतली होती. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने महाराष्ट्रासाठी परदर्शी ठरवा अशी वास्तू उभी करण्यासाठी राज्य सरकारकडून पनवेल महापालिकेला निधी मंजूर करावा ही महत्त्वपूर्ण मागणी या वेळी करण्यात आली. पनवेल महापालिकेने घेतलेल्या निर्णयाचे उपमुख्यमंत्र्यांनी स्वागत केले. यासाठी लागणारा वाढीव निधी राज्य सरकार नक्कीच देईल, अशी ग्वाहीदेखील त्यांनी होती. या आश्वासनाची सरकारने पूर्तता केली आहे.

## शिक्षकांचा आमदार शिक्षकच पाहिजे -आमदार गणेश नाईक

ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या रूपाने एक अभ्यासू व शिक्षकांसाठी अविरत कार्यरत असणारा उमेदवार कोकण विभाग मतदारसंघात निवडणूक लढवित आहेत. त्यामुळे त्यांचा विजय निश्चित असून औपचारिकता बाकी आहे, असे म्हटले. ठाणे जिल्हा म्हात्रे यांना विजयासाठी आघाडी मिळवून देईल, अशी खात्रीदेखील त्यांनी व्यक्त केली.

आपले मनोगत व्यक्त करताना उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी मागील आठ वर्षे सातत्याने शिक्षकवर्गाचे प्रश्न सोडवित असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करून शाळा अनुदानाचा प्रश्न मार्गी लावला आहे. सुमारे ११०० कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले असून शिक्षक मतदारसंघाची निवडणूक झाल्यावर या संबंधीचा अध्यादेश सरकार काढेल, अशी माहिती त्यांनी दिली. अनुदानानंतरचा सर्वांत महत्त्वाचा शिक्षकांच्या जिव्हाळ्याचा विषय निवृत्ती वेतन असून जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी सरकारकडे पाठपुरावा सुरू आहे. शिंदे–फडणवीस सरकार या दृष्टीने सकारात्मक असून वरिष्ठ शासकीय अधिकारी स्तरावर या विषयाचा अभ्यास चालू आहे. जुनी पेन्शन योजनादेखील शिक्षकांना लागू होईल, असा विश्वास म्हात्रे यांनी बोलून दाखविला.

कोकणामध्ये शिक्षक सेनेला रूजविण्याचे, वाढविण्याचे काम मी केले आहे. त्यामुळे शिक्षक सेनेचे सर्व पदाधिकारी आणि प्रमुख कार्यकर्ते माझ्यासोबतच असल्याचा दावादेखील ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी केला.

माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांनी प्रास्ताविकात ज्ञानेश्वर म्हात्रे यांना जिंकून आणणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी असल्याचे नमूद केले.

# माघी गणेश विसर्जनाची गैरसोय टळणार

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईत बुधवारी (दि. २५) माघी गणेशोत्सव साजरा होणार आहे. दीड दिवसाच्या उत्सवाची सांगता विविध तलावांत श्रींच्या विसर्जनाने होते. भक्तांची गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने विसर्जनासाठी नेरूळ तलावाजवळ कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे.

**नेरूळ तलावाजवळ कृत्रिम तलावाची व्यवस्था**


दरवर्षी सुमारे २००पेक्षा जास्त गणेशमूर्तींचे विसर्जन या तलावात होतते. या वर्षी नेरूळ येथील हाशा बाळ्या ठाकूर तलावाच्या दुरुस्तीचे काम मनपा प्रशासनाने हाती घेतले आहे. त्यामुळे या वर्षी गणेशविसर्जनास मोठी गैरसोय होणार होती. हे लक्षात आल्याने भाजपचे माजी नगरसेवक गिरीश म्हात्रे यांनी आयुक्तांना या गोष्टींचे गांभीर्य पत्राद्वारे निदर्शनात आणून दिले आणि विसर्जनासाठी पर्यायी व्यवस्था अथवा कृत्रिम तलाव निर्मिती करावी, अशी विनंती केली होती.

याला सकात्मक प्रतिसाद देत प्रशासनाने नेरुळ तलाव परिसरात दोन कृत्रिम तलावाची तसेच रामलीला मैदान सेक्टर १२ व बामनदेव झोटिंगदेव मैदान सेक्टर २८ येथे कृत्रिम तलावाची निर्मिती करण्याचे मान्य केले. त्यामुळे गणेश विसर्जाची होणारी गैरसोय दूर होणार आहे.

# ड्रोनच्या साहाय्याने वीजपुरवठा; महापारेषणला पारितोषिक

**मुंबई : प्रतिनिधी**

नवी दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या ७६व्या स्कॉच पुरस्काराची घोषणा करण्यात आली. यामध्ये पॉवर आणि एनर्जी या विभागांतर्गत ईएचव्ही लाईन पॅट्रोलिंगमध्ये ड्रोनचा उपयोग यासाठी महापारेषणला राष्ट्रीय स्तरावर सिल्व्हर पारितोषिकाची घोषणा झाली.



महापारेषण कंपनीने दुर्गम भागातही ड्रोनच्या सहाय्याने वीजपुरवठा अखंडित ठेवण्यासाठी व विजेचे वहन करण्यासाठी याचा वापर केला आहे. या पारितोषिकाबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिनेश वाघमारे यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

या पुरस्काराबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिनेश वाघमारे म्हणाले, महापारेषणच्या यशाचे श्रेय मी माझ्या टीमला देतो. अधिकारी व कर्मचारी यांच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे महापारेषणला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. महापारेषणने आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरली आहे. त्यामुळे भविष्यातही महापारेषणचे अधिकारी व कर्मचारी चांगले काम करतील.



**पनवेल :** शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त कळंबोली येथे बाळासाहेबांच्या शिवसेनेच्या वतीने लहान मुलांच्या नृत्य स्पर्धेचे आयोजन पनवेल जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांच्या वतीने करण्यात आले होते. या वेळी भाजपचे कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील, माजी स्थायी समिती सभापती अमर पाटील, माजी नगरसेवक राजेंद्र शर्मा, बबन मुकादम, बाळासाहेबांच्या शिवसेनेचे कळंबोली शहरप्रमुख तुकाराम सरक, नवीन पनवेल शहर प्रमुख शिवाजी थोरवे, कामोठे शहर प्रमुख सुनील गोवारी, रामदास शेवाळे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीकांत फाळके, शंकर विरकर, महेश गोडसे, संजय शेडगे आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# निवृत्तीचे वेध

गैरमार्गाने मिळवलेली सत्ता राबवताना महाविकास आघाडीच्या सरकारने अनेकदा नियमबाह्य किंवा घटनाबाह्य उद्योग केले. त्याला राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी अत्यंत जागरुकतेने अडसर घातला. किंबहुना राज्यपाल कोश्यारी यांनी डोळ्यात तेल घालून आपल्या सरकारचा कारभार पाहिला नसता तर त्या अडीच वर्षांत महाराष्ट्राची दुर्दशा झाली असती. याच जागरुकपणाची किंमत राज्यपाल कोश्यारी यांना सतत मोजावी लागली आहे.

**याना त्या कारणाने राजकीय वादळांच्या केंद्रस्थानी राहिलेले महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना निवृत्तीचे वेध लागले आहेत. आपल्याला पदमुक्त करावे, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली असून तशा प्रकारची विनंती त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे मुंबई दौऱ्याच्या वेळीच केली होती असे दिसते. पंतप्रधान मोदी यांचा यशस्वी मुंबई दौरा नुकताच झाला. त्यावेळी राज्यपाल महोदय पूर्ण वेळ कार्यक्रम स्थळी उपस्थित होते. राजकीय जबाबदारीतून मुक्त होऊन जीवनाचा उर्वरित काळ चिंतन आणि मननात व्यतीत करण्याचा त्यांचा मानस आहे. राज्यपाल कोश्यारी यांची राजकीय पार्श्वभूमी संघ कार्यकर्त्याची आहे हे कधीच लपून राहिले नव्हते. ना त्यांनी आपली संघाची ओळख लपवली, ना कधी त्याचा डांगोरा पिटला. हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पददेखील त्यांनी भूषवले होते. संघाच्या मुशीत घडलेले अनुभवी व मुरब्बी नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे आदराने पाहिले जात होते. एक सेवाभावी कार्यकर्ता म्हणून त्यांनी दीर्घकाळ त्यांच्या मातृ राज्याची आणि देशाची सेवा केली. याचे फलित म्हणूनच त्यांना राज्यपाल पदी सन्मानाने बसवण्यात आले. देशभरामध्ये कोश्यारी यांची प्रतिमा अतिशय उजळ असली तरी महाराष्ट्रात मात्र त्यांच्या वाट्याला तो आदरभाव आला नाही. अर्थात याला कारणीभूत तेव्हाच्या राजकीय घडामोडी होत्या. राज्यपाल पदी नियुक्ती झाल्यानंतर कोश्यारी मुंबईतील राजभवनामध्ये स्थानापन्न झाले, त्याच सुमारास महाविकास आघाडीचे सरकार सत्तेची जुळवाजुळव करत होते. जनमताचा कौल धुडकावून लावत शिवसेनेने भारतीय जनता पक्षासोबतची युती तोडली आणि ज्यांच्याविरोधात निवडणुकीत यश मिळवले, त्या पराभूत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेससोबत सोयरीक केली. या काळात अनीतीमान राजकारणाला ऊत आला होता. सत्तेसाठी एखाद्या पक्षाने मतलबीपणा करून हलक्या दर्जाचे राजकीय डावपेच लढवून राजकारण केले तर ते एकवेळ समजून घेण्याजोगे. मनाला पटले नाही तरी घटनेच्या चौकटीत राहून अशा चौकटींना कधी कधी मान डोलवावी लागते, परंतु अपमान, अवहेलना, टीकेचे प्रहार सहन करत कोश्यारी यांनी कर्तव्यकठोरपणे आपली घटनादत्त जबाबदारी पार पाडली. या खातर त्यांचे आभारच मानले पाहिजेत. महाविकास आघाडी सरकारच्या नेत्यांनी राज्यपाल कोश्यारी यांचा अपमान करण्याची एकही संधी कधी सोडली नाही. बारा आमदारांच्या नियुक्तीचा प्रश्न असो किंवा कोरोना काळातील मंदिरबंदीचा विषय असो विविध ठिकाणी राज्यपालांनी केलेली भाषणे असोत वा राज्यातील विद्यापीठांच्या कारभारातील समस्या असोत, दरवेळी राज्यपालच अकारण टीकेचे लक्ष्य बनले. ही किंमत त्यांना मोजावी लागली कारण महाविकास आघाडीच्या नेत्यांना मनाजोगता कारभार त्यांनी करू दिला नाही. राज्यपाल कोश्यारी यांनी पदमुक्तीची इच्छा पंतप्रधानांकडे व्यक्त केली आहे, परंतु अजुन तसा काही निर्णय झालेला नाही. महाराष्ट्राबद्दल त्यांनी आपल्या प्रसिद्धीपत्रामध्ये कृतज्ञता व्यक्त केली आहे. महाराष्ट्राची जनताही त्यांच्या प्रती कृतज्ञ आहे व राहील.**

# लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी...

लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी. धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी, एवढ्या जगात माय मानतो मराठी, आमुच्या मनामनात दंगते मराठी, आमुच्या रगारगात रंगते मराठी आमुच्या उराउरात स्पंदते मराठी, असे आपण अभिमानाने म्हणतो. दरवर्षी २७ फेब्रुवारीला जगभरातील मराठी भाषकांकडून मराठी दिन साजरा करतो. राज्यात सध्या १४ ते २८ जानेवारी हा कालावधी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' म्हणून साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्त विविध स्पर्धा, कार्यक्रम घेतले जात आहेत.

**खबरबात**
**नितीन देशमुख**

मराठी भाषेचे वय हे साधारणपणे १५०० वर्ष मानले जाते. या काळात समाज जीवनातल्या बदलानुसार ही भाषा बदलत राहिली असे मानले जाते. मराठी ही एक समृद्ध भाषा आहे. 'अमृतासही पैजा जिंके'अशा शब्दांत ज्ञानेश्वरांनी या भाषेचे कौतुक केले होते. जसा काळ बदलतो तसे भाषेमध्येही बदल होतात. बोली भाषादेखील तितक्याच समृद्ध आहेत. त्याची लाज वाटण्यासारखे काहीच नाही. उलट बोली भाषेमुळे आपण विशिष्ट प्रांतांची ओळख मोठी करतोय असे त्याच्याकडे पाहून त्याचा संवर्धन करणे आवश्यक आहे. मराठी भाषेचा उदय संस्कृतचा प्रभावाखाली निर्माण झालेल्या प्राकृत भाषेचा महाराष्ट्री या बोलीभाषेपासून झाला, असे बहुतांशी मानले जाते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवली आणि पेशव्यांनी या साम्राज्याचा विस्तार केला. त्यानंतर मराठी भाषेस राजाश्रय मिळाला. याकाळात मोरोपंतांनी मराठी भाषेत ग्रंथरचना केल्या तसेच श्रीधर या कवीने आपले हरिविजय व पांडव प्रताप या काव्यांद्वारे खेड्यापाड्यात आपल्या मराठी कविता पोहचवल्या. याच काळात शृंगार व वीर रसांना स्वतंत्र स्थान मिळाले. यासाठी लावणी व पोवाडा हे हे नवीन वाङ्मय प्रकार मराठीत निर्माण झाले. वाङ्मय हा रंजनाचा प्रकार आहे हे समाजाने मान्य करण्यास सुरुवात केली. याच काळात बखर लेखनाची सुरुवात झाली.

इ. स. १९४७ नंतर स्वतंत्र भारत देशाने मराठीला अधिकृत राज्यभाषेचा दर्जा दिला. इ. स. १९६० मध्ये मराठी भाषिकांचा एकसंध महाराष्ट्र राज्यास मान्यता मिळाली आणि मराठीस राजभाषेचा मुकुट प्राप्त झाला.

मराठी भाषा भारतासह मॉरिशस व इस्रायल या देशांतही बोलली जाते. त्याचबरोबर जगभरात विखुरलेल्या मराठी-भाषकांमुळे मराठी अमेरिकेची संयुक्त संस्थाने, संयुक्त अरब अमिरात, दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान, सिंगापूर, जर्मनी, युनायटेड किंगडम, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड येथेही बोलली जाते

भारतात, मराठी मुख्यत्वे महाराष्ट्र राज्यात बोलली जाते. त्याचबरोबर गोवा, कर्नाटक, गुजरात, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, तामिळनाडू व छत्तीसगढ राज्यांत आणि दमण आणि दीव, दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशांतील काही भागातही मराठी बोलली जाते. भारताचा राज्यघटनेतील २२ अधिकृत भारतीय भाषांचा यादीत मराठीचा समावेश आहे. मराठी ही महाराष्ट्र राज्याची एकमेव अधिकृत राजभाषा आहे. गोवा राज्यात कायद्यानुसार कोकणी ही राजभाषा असली तरी मराठीचा वापर शासनाचा सर्व व कोणत्याही कारणासाठी होऊ शकतो. शासनाशी मराठीत होणाऱ्या पत्रव्यवहाराचे उत्तर मराठीतच दिले जाते. असे असले तरी राज्यकारभार आणि पत्रव्यवहार लोकांचा सोयीसाठी इंग्रजीतून केला जातो. दादरा व नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशात मराठी एक अधिकृत राजभाषा आहे.



मराठी भाषेचे एक खास वैशिट्य म्हणजे तिच्या बोलीभाषा. मुंबई, पुणे नाशिक अशा महाराष्ट्राच्या प्रमुख शहरांमध्ये अनेकजण प्रमाण भाषेतील मराठीमध्ये बोलतात, पण विविधतेने नटलेल्या आपल्या भारतामध्ये दर १२ कोसानंतर संस्कृती बदलते आणि सोबतच भाषादेखील बदलते. मराठीप्रमाणेच प्रदेशागणिक बदलत जाणाऱ्या बोली भाषेची एक वेगळी ओळख आहे. काही लोकांची त्यावरून थट्टा होते, पण आजकाल सिनेमा, टेलिव्हिजन क्षेत्रामध्ये बोली भाषेचा वापर वाढल्याने आता प्रांताच्या सीमा पुसट होऊन अनेकांनी ते शब्द नेहमीच्या बोलण्यात वापरायला सुरूवात केली आहे. मराठी ही एक समृद्ध भाषा असली तरीही त्याच्या १३ खास बोलीभाषांची मज्जादेखील काही और आहे.

कर्नाटकच्या सीमेवर मराठीवर कानडी भाषेचा प्रभाव आहे. त्यामुळे थोडे उर्दु, थोडे कारवाचक प्रत्यय यामुळे मराठवाडी बोली भाषा खास होते. कोकण प्रांतात आणि प्रामुख्याने तळकोकणात भाषा अत्यंत मधाळ आहे. हेल काढून आणि अनुनासिक उच्चार यामुळे या भाषेचा गोडवा काही और आहे. मालवणी नाटक आणि दशावतार यामुळे ही बोलीभाषा आज जगाच्या कानाकोपर्यात पोहचली आहे. भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या भागांना 'झाडपट्टी' म्हणून ओळखले जाते. त्यामुळे त्यांची बोलीभाषा 'झाडीबोली'. 'ण, छ, श, ष आणि ळ' ही पाच व्यंजन या भाषेत वापरलीच जात नाहीत. नागपूर, वर्धा, चंद्रपूर या भागांमध्ये नागपुरी भाषा थोड्या वेगळ्या लहेजाने बोलली जाते. या भाषेवर हिंदी आणि उर्दुचा प्रभाव आहे.

जळगाव जिल्ह्यामध्ये खास अंदाजात भाषा बोलली जाते. या भाषेत नाद आणि लय असल्याने ती ऐकायलाही खास वाटते. अनेक सहित्यिकांनी त्याचा आपल्या लिखाणात वापर केला आहे. रावेर, जामनेर या भागामध्ये 'क' ऐवजी 'ख' बोलले जाते. बहिणाबाईंच्या कवितांमध्ये या भाषेचा अनेकदा वापर केलेला दिसून येतो. अहिराणी आणि तावडीसारखी वाटत असली त्यामध्ये फरक आहे.

मध्य कोकणात प्रामुख्याने आगरी भाषा बोलली जाते. कोळी बांधवांमध्ये ही भाषा प्रामुख्याने आढळते त्यामुळे रायगड, ठाणे या भागात अनेकजण आगरी भाषेमध्ये बोलतात. कर्नाटक, महाराष्ट्र सीमाभागावर या भाषेचा प्रभाव असल्याने कोल्हापूर शहरामध्ये ही भाषा बोलली जात असते. यामध्ये हेल, सुर आणि व्याकरण वेगळे आहे. बुलढाणा, वाशीम, अकोला, यवतमाळ, अमरावती व वर्धा या सहा जिल्ह्यांतून वऱ्हाडी बोलली जाते. 'ड'चा 'ळ', 'ळ'चा 'य' म्हणून वापर केला जातो. भिल्ल समाज प्रामुख्याने देहवाली भाषेत बोलताना तुम्ही पाहिलं किंवा ऐकलं असेल. देहवाली च्या मूळ स्वरात 'ळ', 'क्ष' आणि 'ज्ञ' ही व्यंजने नाहीत, तर 'छ', 'श' आणि 'ष' यांच्याऐवजी 'स' हे एकच व्यंजन वापरले जाते.

धुळे, नंदुरबार या भागात ही बोली वापरात आहे. मूळात रांगडेपणा हीच कोल्हापुरची ओळख असल्याने त्यांच्या भाषेमध्येदेखील याचा रांगडेपणा दिसून येतो. थोडी खेडवळ आणि तरीही लय काढून बोलण्याची पद्धत असल्याने त्याला खास गोडवा आहे. मराठी भाषांच्या विविध प्रकारांमध्ये पुणेरी मराठी ही व्याकरणशुद्ध म्हणून ओळखली जाते. साहित्य, कलाकार विद्यानगरीमध्ये राहत असल्याने त्याचा प्रभाव येथील स्थानिकांवर दिसून येते. बेळगाव हादेखील सीमाभागावरचा एक प्रांत आहे. कन्नड, चंडगडी, कोल्हापुरी, कोकणी अशा सगळ्याच भाषांची येथे भेसळ आहे. अनेक साहित्यिकांना बेळगावी भाषेचा त्यांच्या साहित्यामध्ये समावेश करण्याचा मोह आवरला नाही. उत्तर कोकणातील ठाणे जिल्ह्यात किनाऱ्यालगतच्या भागात वाडवळी बोली भाषा बोलली जाते. वसई भागातील स्थानिक प्रामुख्याने या भाषेचा वापर करतात.


आज आपण आपल्या भाषेचा म्हणजेच आपल्या मायबोलीचा त्याग करून इंग्रजी भाषेचा अवलंब करीत आहोत. इंग्रजी ही काळाची गरज आहे, नक्कीच, याबद्दल दुमत नाही; परंतु, त्यासाठी आपण मराठीची कास सोडावी, हे मनाला पटणारे नाही. आज आपण आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत शिक्षणासाठी पाठवतो, मध्यंतरी मराठी भाषा कशी अवघड आहे आणि काना, मात्रा, उकार आणि वेलांटीने आम्ही कसे हैराण झालो आहोत, अशा आशयाचे विद्यार्थ्यांचे व्हिडीओ व्हॉट्सॲपवर व्हायरल करण्यात आले होते. मुलांना मराठीचे ज्ञान योग्य देण्याऐवजी आपण ते व्हिडीओ एकमेकांना पाठवून मजा घेत होतो.

अशाप्रकारे मराठी भाषा संवर्धन होणार नाही तरुण मुलांना इंग्रजीसोबत मराठी भाषेचे ज्ञान द्या, मुलांना मराठी शाळेत पाठवा, जर इंग्रजी शाळेत गेला तर आपल्या विद्यार्थ्याची दुसरी भाषा मराठी असावी हा कटाक्ष तुम्ही तुमचा ठेवा. तुमच्या मुलांना महाराष्ट्राचा इतिहास, मराठीचा इतिहास, आपल्या भाषेतील साहित्य वाचायला प्रवृत्त करा, हे करताना तुम्ही ते पहिले करीत आहात का, हे पहा. लहान मुले आपलेच अनुकरण करीत आहात म्हणून पहिले स्वतः करा नंतर दुसऱ्यांमध्ये बदल घडवायला जा. म्हणूनच सुरुवात स्वतःच्या घरातून करा. सर्वात महत्त्वाचे म्हणजे बदल एका रात्रीत घडणार नाही म्हणून आपले प्रयत्न सुरूच ठेवा. जय मराठी, जय महाराष्ट्र!

**माझ्या मराठी मातीचा,**
**लावा ललाटास टिळा,**
**हिच्या संगाने जागल्या,**
**दऱ्या खोऱ्यातील शिळा।**



## बदलते तंत्रज्ञान



# व्हॉट्सॲपवर असे डाउनलोड करा प्रजासत्ताक दिनाचे स्टिकर्स

व्हॉट्सॲप हे मेटाच्या मालकीचे माध्यम आपल्या युजर्ससाठी नवनवीन फीचर्स आणत असते. व्हॉट्सॲप हे एक सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आहे. हे मेटाच्या मालकीचे आहे. यावरून आपण एकमेकांशी संवाद साधू शकतो कारण हे एक मेसेजिंग ॲप आहे. यावरून आपल्याला फोटोज, व्हिडीओ शेअर करणे, व्हॉईस कॉल्स आणि व्हिडीओ कॉल्सदेखील करता येतात.

कोणताही सण असो किंवा आनंदाचा दिवस असो आपण एकमेकांना शुभेच्छा देत असतो. त्यांना व्हॉट्सॲपचे स्टिकर्स आणि कोट्स डाउनलोड करण्यास आवडत असते. यावर्षी भारत २६ जानेवारी २०२३ रोजी आपला प्रजासत्ताक दिन साजरा करणार आहे. या वेळी व्हॉट्सॲप वरून तुम्हाला प्रजासत्ताक दिनाचे स्टिकर्स डाउनलोड कसे करायचे व आपल्या मित्रांना कसे पाठवायचे हे आपण जाणून घेऊयात.

१. प्रथम Google play Store उघडा आणि प्रजासत्ताक दिन whatsapp stickers सर्च करा.
२. यानंतर तुम्ही तुमच्या आवडीचा स्टिकर पॅक निवडा आणि तो पॅक डाउनलोड करा.
३.त्यानंतर कन्फर्म करून Add बटनावर क्लिक करा.
४. त्यानंतर कन्फर्म करून Add बटनावर क्लिक करा.
५. ते Add केल्यानंतर व्हाट्सॲंपवर जाऊन ज्यांना तुम्हाला पाठवायचे आहे ती चॅट विंडो उघडा.
६. त्यानंतर स्टिकर्स सेक्शनमध्ये जाऊन रवव केलेल्या स्टिकर पॅकवर नेव्हीगेट करा.
७. स्टिकर पाठवण्यासाठी कोणत्याही स्टिकरवर क्लिक करा आणि ज्यांना पाठवायचे आहे त्यांना स्टिकर सेंड करा.

अशा प्रकारे तुम्ही एकमेकांना प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी व्हॉट्सॲपवरून स्टिकर पाठवू शकता. व्हॉट्सॲप हे मेटाच्या मालकीचे माध्यम आपल्या युजर्ससाठी नवनवीन फीचर्स आणत असते.

# भाविकांचे श्रद्धास्थान चिरनेरचा महागणपती

कोरोना महामारीनंतर तब्बल दोन वर्षांनंतर आलेला हा माघी गणेशोत्सव यंदा मोठ्या उत्साहात साजरा होणार असल्याचे वातावरण दिसत आहे. हजारो भाविकांचे श्रद्धास्थान बनलेल्या चिरनेर महागणपतीच्या दर्शनासाठी राज्याच्या विविध ठिकाणाहून भक्तगण चिरनेर मुक्कामी दाखल होणार आहेत. अशा या रायगड जिल्ह्याच्या उरण तालुक्यातील चिरनेर शब्द उच्चारला की, श्री महागणपती व चिरनेर जंगल सत्याग्रह ही दोन नावे पुढे येतात. ऐतिहासिक महत्त्व असलेल्या या चिरनेर गावात पेशव्यांनी उभारलेल्या मंदिरात स्वयंभू प्राचिन श्री महागणपती विराजमान आहेत. याच गावात शिलाहार राजाच्या कारकिर्दीत ८१० ते १२६० या कालावधीत शिवमंदिर उभारण्यात आले असावे. पेशव्यांच्या काळात महाराष्ट्रात अनेक ठिकाणी गणेशाची मंदिरे उभारण्यात आली.

चिरनेर येथे सुभेदारांच्या कृपेने गणपतीच्या देवळाची निर्मिती करण्यात आली. मंदिराचे बांधकाम पूर्णपणे शास्त्रशुद्ध असून, जिर्णोदराच्या वेळी यात कोणताही बदल केलेला नाही. मुख्य देऊळ मात्र पूर्वीसारखेच सुरक्षित आहे. जाणकारांच्या मते हे मंदिर हेमाड पंथीय आहे. मंदिराचे बांधकाम सिमेंट चुनारहीत चिरेबंदी दगडाचे असून, चिरे फारच प्रचंड आहेत. आतील गाभाऱ्यात वरच्या कळसाच्या बाजूस अष्टकोनी नक्षीकाम साधून कमळ पाकळ्यांचा घुमटीचा आकार घेतला आहे. त्यामुळे त्यात घुमणारे ओमकार व शंखानाद एक वेगळे चैतन्य निर्माण करते. गणपतीची मूर्ती पूर्वाभिमुख असून डाव्या सोंडेची आहे. मूर्तीच्या मागे दोन खांबांवर महिरपी सप्तकमान आहे. अतिशय लोभस आणि अष्टविनायकाचा विचार करता भव्य असणाऱ्या या गणपतीची पूजा श्रीमंत पेशव्यानी केल्याचा उल्लेख मराठी शाहित सापडतो.

दिवाबत्तीच्या व्यवस्थेकरीता देवाच्या नावावर जमीन आहे. संकट निवारण करणारा आणि भक्तगणांच्या हाकेला धावून येणारा अशीच श्रद्धा असलेल्या चिरनेर महागणपतीच्या दर्शनासाठी दर मंगळवारी व रविवारी विविध ठिकाणाहून भाविक येत असतात. संकष्टी चतुर्थी व अंगारकी चतुर्थीलाही दर्शनासाठी मोठी रांग असते.



**निमित्त**

गणेश जयंतीच्या दिवशी मात्र गर्दीचा उच्चांक होत असतो. उत्सवानिमित्त चिरनेरच्या नागरिकांनी भक्तांच्या स्वागतासाठी स्वागत फलक जागोजागी उभे केले आहेत. विविध महत्त्वाच्या ठिकाणी स्वागत कामिनी उभारल्या गेल्या आहेत. निसर्गाने नटलेल्या पौराणिक आणि ऐतिहासिक घटनांची साक्ष देणाऱ्या उरण तालुक्यातील हे महागणपतीचे मंदिर चिरनेर येथे असून, पेशव्यांच्या काळात या मंदिराचे बांधकाम केलेले आहे. हे गणपती देवस्थान अत्यंत जागृत असून, या ठिकाणी आलेल्या भाविकांची दुःखे निश्चित दूर होतात अशी श्रद्धा आहे.

असे अनुभव या गणेशाचे दर्शन घेणाऱ्या भाविकांना आलेले आहेत. विवाहाच्या वेळी या भागातील लोक प्रथम मंदिरात येतात व दर्शन घेऊन पुढचा विधी करतात. माघ शुद्ध प्रतिपदा ते पंचमीच्या गणेशाच्या जन्मोत्सवाच्या वेळी माघ चतुर्थीला देवाच्या प्रसादाचा नारळ घेतल्यास हमखास पुत्र प्राप्ती होते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. चिरनेर महागणपतीची मूर्ती आकाराने जशी मोठी आहे, तसे भाविकांना चांगले अनुभव देण्यातही मोठी आहे. महागणपतीची शेंदूर चर्चित पाषाणी दगडाची पूर्वाभिमुख मूर्ती सहा फूट उंच व साडेतीन फूट रुंद अशी चतुर्भुज असून, हातात खडगं व पाश आहेत. मंदिराच्या समोर असलेल्या तलावात ही गणेशाची मूर्ती सापडली असे बोलले जाते.

चिरनेर गावाचे आराध्य दैवत असणाऱ्या या महागणपतीने चिरनेर गावाला नावलौकिक मिळवून दिले आहे. माघ उत्सवातील चतुर्थीतीला येथे गजानन प्रत्यक्ष भोजनास येतात. अशी श्रद्धा असल्याने, या दिवशी भक्तांची गर्दी असते. या दिवशी श्रींना महानैवद्य आणि त्याच दिवशी सर्व गणेश भक्तांना महाप्रसादाचा लाभ मिळतो. या उत्सवात होणाऱ्या गर्दीची रांग लांबच लांब असते. त्यामुळे दिवसभर गणेश भक्तांना रांगेत उभे राहावे लागते. त्यांच्या सेवे करीता चिरनेर व परिसरातील भाविक भक्त, पाणी वाटप व रांगा नियंत्रित करण्याचे काम करीत असतात. या वेळी ग्रामस्थ गणेश भक्त महाप्रसादाचे वाटप व गर्दीवर नियंत्रण राखण्याचे व परिसरातील स्वच्छता ठेवण्याचे काम करून, गणेश भक्तांना सहकार्य करीत असतात. श्री गणेश ही बुद्धीची देवता त्यामुळे तिचे स्मरण केले तर माणसाला सद्बुद्धी मिळते.

चिरनेर गावाचे महागणपती मंदिर हे अद्याप सर्व दूर प्रसिद्ध पावले नसले तरी त्यातील गणरायाच्या आगळ्या वेगळ्या आणि भव्य तसेच देखण्या रूपामुळे महाराष्ट्रात अष्टविनायका नंतर ९ वाजता गणपती असा आज बोलबाला होऊ लागला आहे. हे मात्र तितकेच खरे आहे. महागणपती या शब्दाचे अर्थ अनेक असून, ती धनाची देवता, पराक्रमाची देवता, यश आणि सिद्धीची देवता अशा विविध अर्थांचा त्यात समावेश आहे. मंदिरात प्रवेश करताच मनाला अध्यात्मिक प्रसन्नता देणारे चिरनेर महागणपतीचे गोजिरवाणे रूप महाराष्ट्रातील गणेश भक्तांना ध्यानातून, पूजनातून, चिंतनातून सुखकारक भाग्यदायी व मनोकामना पूर्ण करणारे ठरते. हेही तितकेच खरे आहे. उत्सवाच्या वेळी अनेक सामाजिक संस्थांकडून गणेश भक्तांना सहकार्य केले जाते. असा हा यंदा २५ जानेवारी २०२३ रोजी साजरा होणारा महागणपतीचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात पार पाडण्यात चिरनेर वासिय सज्ज झाले असून,या उत्सवासाठी जनसागर ओसंडणार असल्याने पहाटेपासूनच भक्तगणांना श्रींचे योग्य रित्या दर्शन घेता यावे यासाठी गणपती देवस्थान ट्रस्ट व गावकऱ्यांनी सेवेसाठी तत्परता ठेवली आहे.

**-जीवन केणी, उरण**

## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात कमी पाणी पिणे महिलांना ठरू शकते त्रासदायक

हिवाळा हा आपल्या आयुष्यात अनेक बदल घडवून आणतो. या ऋतूत आपली जीवनशैली अन्नापासून ते राहणीमानापर्यंत पूर्णपणे बदलते. थंडी पडताच तहान कमी लागत असल्याने अनेकजण पाण्याचे सेवन कमी करतात. पण असे करणे आपल्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. विशेषत: महिलांना थंडीत पाणी न मिळाल्याने त्रास होऊ शकतो. हिवाळ्यात महिलांनी आपल्या जीवनशैलीत कोणते बदल करावेत हे जाणून घेऊया.



डॉक्टरांच्या सांगण्यानुसार, या ऋतूत महिलांनी थंड पाणी पिण्याऐवजी कोमट पाणी प्यावे. थोड्या-थोड्या वेळाने पुरेसे पाणी प्यावे. अन्यथा डिहायड्रेशनचा त्रास होऊ शकतो. तसेच हिवाळ्यात फास्ट फूड खाणे टाळावे. जास्त तळलेले अन्नदेखील नुकसान करते. त्यामुळे ते खाणे टाळणेच योग्य ठरते. तसेच व्हिटॅमिन सी मध्ये अँटी-ऑक्सिडेंट मुबलक प्रमाणात असतात, त्यामुळे हिवाळ्यात त्याचे सेवन करावे.


**गर्भवती महिलांनी घ्यावी विशेष काळजी** - थंडीच्या ऋतूमध्ये गर्भवती महिलांनी विशेष काळजी घ्यावी, त्यांच्या सर्व चाचण्या नियमितपणे करून घ्याव्यात आणि डॉक्टरांच्या सतत संपर्कात राहावे, असे डॉक्टरांनी सांगितले आहे. यासोबतच थंडीत येणारी फळं आणि भाजीपाला यांचे सेवन पुरेशा प्रमाणात करावे, जेणेकरून त्या निरोगी राहू शकतील. कुटुंबाची काळजी घेण्यात व्यस्त असलेल्या महिला आपल्या आरोग्याबाबत बेफिकीर होतात, त्या स्वतःच्या खाण्याकडे लक्ष देत नाहीत. त्यामुळे महिलांनी स्वत:साठीही वेळ काढणे फार महत्त्वाचे आहे.

**नियमितपणे करावा व्यायाम -** डॉक्टरांच्या मते महिलांनी आपल्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी. अशा परिस्थितीत, त्यांनी नियमितपणे हलका व्यायाम करणे आवश्यक आहे. चालणे हा देखील चांगला व्यायाम आहे. म्हणूनच दररोज किमान ३० मिनिटे चालावे. हवामानातील सततच्या बदलामुळे, दिवसा अनेकदा थंड आणि गरम असा बदल जाणवू लागतो. अशा परिस्थितीत या ऋतूमध्ये व्हायरल इन्फेक्शनचे प्रमाण लक्षणीय वाढते. त्यामुळे अतिरिक्त सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

**काही वेळ उन्हात बसावे -** थंड हवामानात जास्त गार वातावरणात जावे टाळावे. अशा वेळी सकाळी लवकर घराबाहेर पडणे टाळण्याचा प्रयत्न करा. तसेच, घराबाहेर जाताना पुरेसे उबदार कपडे घालावेत. फिरायला जात असाल तर थंडी कमी झाल्यावरच बाहेर जा. यासोबतच शरीरात व्हिटॅमिन डीचा पुरवठा करण्यासाठी रोज सकाळी काही वेळ उन्हात बसा. सूर्यप्रकाश हा व्हिटॅमिन डीचा नैसर्गिक स्रोत आहे.

# रोह्यात अद्ययावत रुग्णालयाची गरज

## उपचारासाठी गाठावी लागतात मोठी शहरे



**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याच्या मध्यवर्ती तालुका म्हणून रोहा तालुक्याची ओळख आहे. वाढते शहरीकरणामुळे नागरिकरणही वाढत आहे. या नागरिकांना विविध सुविधा मिळवणे आवश्यक आहे. नागरिकांना अत्यंत आवश्यक असलेली आरोग्य सुविधा तालुक्यात कमी पडताना दिसत आहे.

अपघात अथवा अन्य मोठ्या आजाराच्या उपचारासाठी मुंबई, पुणे, पनवेल शहरातील रुग्णालय नागरिकांना गाठावे लागत आहे. या शहरातील रुग्णालय गाठेपर्यंत जीव गमवावा लागत आहे. अनेकदा मोठ्या शहरात रुग्णाला घेऊन जात असताना त्याची होळसांड होत आहे. या सर्व बाबीचा विचार करता रोहा शहरात अद्ययावत रुग्णालय आवश्यक आहे.

तालुक्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिकरण आहे. धाटाव व नागोठणे येथे मोठ्या प्रमाणात कारखाने आहेत. या औद्योगिक क्षेत्रात रासायनिकसह अन्य कारखाने आहेत. या कारखान्यात एखादा अपघात घडल्यास कारखान्यातील कामगारांना स्थानिक खासगी व सरकारी रुग्णालयात प्राथमिक उपचार केल्यानंतर पनवेल, मुंबई, पुणे येथे उपचारासाठी घेऊन जावे लागत आहे. कामगारांची मोठी संख्या पाहता रोह्यात अद्ययावत रुग्णालय असल्यास त्याचा फायदा कामगारांना होईल. काही वेळा कामगारांना माणगाव येथे उपचारासाठी नेण्यात येते. रोहा तालुक्यात काही भाग ग्रामीण आहे. या ग्रामीण भागात एखाद्या व्यक्तीला सर्पदंश झाला तर त्याला उपचारासाठी अलिबाग येथे घेऊन जाण्यात येते. कधी कधी हा रुग्ण दगवण्याची शक्यता आहे. रोह्यातच रुग्णावर उपचार करण्यासाठी परिपूर्ण सुविधा असल्यास रुग्णाला त्याचा फायदा होऊ शकतो.

रोहा तालुक्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग जातो. यांसह मुरूड-पुणे-खोपोली व ताम्हिणीमार्गे राज्यमार्ग आहे. मोठ्या प्रमाणात पर्यटक मुरूड व अलिबाग येथे पुणे येथून रोह्यामार्गे जात असतात, तर तळ कोकणात जाण्यासाठी मुंबई-गोवा महामार्गाचा वापर केला जातो. या मार्गांवर अनेकदा अपघात झाले आहेत. या अपघातात वेळेस उपचार न मिळाल्यामुळे कित्येकदा रुग्ण दगवला आहे. या अपघातातील रुग्णाला वेळेत उपचार मिळाल्यास रुग्ण वाचण्याची जास्त शक्यता आहे. रोह्यात वाढते नागरिकरण पाहता नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून रोहा शहरात अद्ययावत रुग्णालयाची गरज आहे. किमान औद्योगिक क्षेत्रात एखादे रुग्णालय आवश्यक आहे.

# जिल्हाधिकारीपदी डॉ. योगेश म्हसे रुजू

## अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून उत्स्फूर्त स्वागत

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**




रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांची कोकण विभागीय आयुक्त म्हणून नियुक्ती झाल्यानंतर त्या रिक्त पदी जिल्हाधिकारी म्हणून डॉ. योगेश म्हसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. म्हसे मंगळवारी (दि. २४) रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात रुजू झाले.

या वेळी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव म्हस्के-पाटील, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहेत्रे, जिल्हा खनिकर्म अधिकारी रोशन मेश्राम, जिल्हा प्रशासन अधिकारी श्याम पोशट्टी, प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, विठ्ठल इनामदार, अमित शेडगे, उमेश बिरारी, ज्ञानेश्वर खुटवड, अजित नैराळे तसेच सर्व तहसिलदारांनी डॉ. म्हसे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

नूतन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे हे यापूर्वी म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते, तसेच महाराष्ट्र स्टेट मार्केटिंग फेडरेशनचे महाव्यवस्थापक म्हणूनदेखील त्यांनी काम पाहिले आहे.

एक कार्यक्षम अधिकारी म्हणून ओळख असणाऱ्या डॉ. योगेश म्हसे यांची भिवंडी-निजामपूर मनपा आयुक्त, पिंपरी-चिंचवड प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कारकीर्द विशेष गाजली होती.

# महावितरणचा लाचखोर कनिष्ठ अभियंता 'एसीबी'च्या जाळ्यात

**मुरूड : प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या मुरूड उपविभाग अंतर्गत असणाऱ्या कोकबन येथील कनिष्ठ अभियंता ओम विश्वनाथ शिंदे (वय २९ कनिष्ठ अभियंता कोकबन शाखा (वर्ग ३)) या लाचखोर अभियंत्यास अलिबाग येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १५ हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ ताब्यात घेतले आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या मुरूड उपविभाग अंतर्गत असणाऱ्या रोहा तालुक्यातील कोकबन येथे कार्यरत असणारे वर्ग तीनचे कनिष्ठ अभियंता ओम विश्वनाथ शिंदे यांनी तक्रारदार (वय २५) यांच्याकडुन त्यांच्या राहत्या घराचा विद्युत पुरवठा हा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने काही कारणास्तव खंडित केला होता.

तक्रारदार यांचा खंडित केलेला विद्युत पुरवठा हा सुरळीत करण्यासाठी लाचखोर अभियंता ओम विश्वनाथ शिंदे यांनी २० हजार रुपये लाचेची मागणी केली होती, मात्र तडजोडीअंती १५ हजार रुपयांवर तडजोड झाली. यानंतर याबाबत तक्रारदाराने लाचलुचपत विभागाकडे तक्रार दाखल केली होती. लाचलुचपत विभागाने सापळा रचून तक्रारदार यांच्याकडून ओम शिंदे यांनी कोकबन येथील कार्यालयात लाच घेत असतानाच लाचलुचपत विभागाने ताब्यात घेतले.

ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या रायगड लाचलुचपत विभागाच्या पोलीस उपअधीक्षक सुषमा सोनवणे यांच्या सूचनेनुसार लाचलुचपत विभागाचे पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक रणजित गलांडे, पोलीस हवालदार अरुण करकरे, पोलीस हवालदार महेश पाटील, पोलीस नाईक विवेक खंडागले, पोलीस नाईक जितेंद्र पाटील यांच्या पथकाने केली आहे.

यानंतरही जर कोणत्याही शासकीय अधिकारी अथवा कर्मचाऱ्याने आपले कर्तव्य करण्यात कसूर करून लाच मागितली तर न घाबरता तक्रार दाखल करण्याचे आवाहन विभागातर्फे करण्यात आले आहे.

# बोरघाटात अपघात रोखण्यासाठी आयआरबी यंत्रणा ॲक्शन मोडवर

**खोपोली : प्रतिनिधी**



मुंबई-पुणे एक्स्प्रेसवर बोरघाटात अंडा पॉईंट येथे होणारे अपघात रोखण्यासाठी आयआरबी यंत्रणा व पोलीस यंत्रणेकडून अवजड वाहतूक बंद असल्याने सूचनाफलक लावण्यात आले आहेत.

लोणावळा व खंडाळा येथून खोपोलीच्या दिशेने येताना, जुन्या मार्गावर अंडा पॉईंट मार्गाचा वापर केला जात होता, पण याचा फायदा अवजड वाहने व बसचालक घेऊ लागले. यामुळे अपघात वाढले होते. त्यामुळे प्रशासन व पोलीस सतर्क झाले होते.

आयआरबी यंत्रणा व पोलिसांनी या मार्गावर मंगळवारी (दि. २४) अवजड वाहतूक रोखण्यासाठी दोन्ही बाजूंनी मातीचा भराव केला व या ठिकाणी सूचनाफलक लावण्यात आले.

टाटा पॉवर किंवा खोपोली गावात येण्यासाठी छोट्या वाहनांना प्रवेश देण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. आता या मार्गावर बस किंवा अवजड वाहने यांना बंदी असणार आहे. त्या वाहनांनी नवीन महामार्गाचा वापर करावा, अशी प्रशासनाने वाहनचालकांना सूचना केली आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत कै.मारुती राम पाटील मयत तर्फे वारस, १) श्री. शंकर मारुती पाटील २) श्री. लक्ष्मण मारुती पाटील ३) श्रीमती. बनीबाई कृष्णा घरत ४) श्रीमती. माईबाई धर्मा पाटील ५) श्रीमती. कमळीबाई लक्ष्मण गायकर ६) श्रीमती. बुधीबाई किसन फडके ७) श्रीमती. बेबीबाई मारुती पाटील ८) कै. मुका मारुती पाटील मयत तर्फे वारस, i) श्रीमती. जानकू मुका पाटील ii) श्री. वसंत मुका पाटील ii) श्री. राजेश मुका पाटील iv) श्रीमती. मालती महादेव जळे v) श्रीमती. उषा नामदेव पाटील vi) श्रीमती. प्रज्ञा विकास पाटील, यांच्यानावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकत' असे उल्लेखलीले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे - वडवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| ३४ | ४ | ०-०६-१०<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकूण ०-०७-६० | ०.३१ |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**दिनांक :- २५/०१/२०२३**

**सही /-**
**ॲड. सदिच्छा दिलीप अस्वले,**
**२०३, मोहिनील अपार्टमेंट,**
**नवे पोपुड, म्हातवली, उरण, रायगड**
**पिन कोड - ४००७०२**
**मोबाईल नं. ७४०००९७२८६**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे लोणिवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील **श्री. कृष्णकांत सोनू बोभाटे** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमीन आमचे अशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे - लोणिवली, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| कब्जेदाराचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. कृष्णकांत सोनू बोभाटे | १० | १/क | ०-३५-००<br>पो.ख. ०-११-००<br>०-४६-०० | ७.७५ |

सबब वर नमूद शेतजमीन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून **२१ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येऊन भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक :- २०/०१/२०२३

**सही/-**
**ॲड. श्री. अमोल शंकर साखरे**
**शॉप नं. १२८, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स,**
**पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो. ८६५२२३३७७१/९३२४३७२१६६/९३२२६५२३१९**

## नदी स्वच्छता, जनजागृती कार्यक्रम

**अलिबाग** : कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर व उपविभागीय अधिकारी उपविभाग अजित नैराळे यांच्या मार्गदर्शनाखाली नदी स्वच्छता व जनजागृती कार्यक्रम नुकताच झाला.

कार्यक्रमाची सुरुवात नदीपूजनाने करण्यात आली. कार्यक्रमांमध्ये विविध सामाजिक संस्थांनी, विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

## पनवेल महानगरपालिका
## जाहीर नोटीस सुचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | श्री. के. बी. पाटील, उप विभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ज.व्य. उपविभाग, भुखंड क्र. १, सेक्टर १, नवीन पनवेल | ०८ विलायती चिंच, २ जंगली, ०१ निलगीरी व ०१ सुकलेल अशी एकुण १२ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत ११६८ मि. मी. व्यासाची पाईपलाईन टाकणेचे काम प्रगतीपथावर असुन त्या पाईपलाईनच्या दरम्यान अडथळा करणारी कळंबोली सर्कल येथील झाडे तोडण्यास परवानगी मिळावी. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र. पमपा/उद्यान/२१२३/प्र.क्र.०६/४२/२०२३
दिनांक :- २४/०१/२०२३

## गृहलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग

मु. त्रिमुर्ती प्लाझा, बी विंग गाळा नं. १०९ पहिला मजला अलिबाग अर्बन बँकेसमोर, ता. अलिबाग जि. रायगड, फोन नं.७७२२०२१७२१

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये

**जाहीर लिलाव नोटीस**

गृहलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग या पतसंस्थेतुन श्री. शंकर रामचंद्र पाटील मु.कुरूळ ता.अलिबाग जि.रायगड यांचे कर्ज थकीत झाल्यामुळे यांची मालमत्ता कर्जदाराकडील येणे असलेल्या थकीत कर्जाची रक्कम वसुलीसाठी खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये जाहीर लिलावाने विक्री करणे आवश्यक झाले आहे. त्यानुसार सोमवार दिनांक २७/०२ / २०२३ रोजी दुपारी ठिक १२.३० वाजता वसुली अधिकारी हे गृहलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग या संस्थेच्या मुख्य कार्यालयात हजर राहून खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत जाहीर लिलावाने विक्री करतील.

**जाहीर लिलाव करावयाच्या स्थावर मालमत्तेचे वर्णन**

तुकडी व जि. रायगड, पोट तुकडी व ता. अलिबाग रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती ता.अलिबाग हद्दीतील ग्रामपंचायत कुरूळ येथील श्री. शंकर रामचंद्र पाटील रा. कुरूळ ता.अलिबाग यांची खालील वर्णनची मिळकत

**मालमत्तेचे वर्णन**

| निवाड्याची किंवा आदेशाची तारीख | निवाडा किंवा आदेश ज्या इसमाविरूध्द दिला आहे त्यांची नाव व गावाचे नाव | मिळकत नं | क्षेत्रफळ | मिळकतीचे वर्णन | शेरा इतर बोजे (नमूद करा) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ८६/१६<br>०८/०२/२०१९ | श्री. शंकर रामचंद्र पाटील मु. कुरूळ, ता. अलिबाग जि. रायगड | कुरूळ गाव ता. आलिबाग घर क्र. ३४८ ब घर क्र. ५२१ ब | घर क्र ३४८ ब ५७६ चौ. फुट घर क्र. ५२१ ब २७५ चौ. फुट | पक्के वीट बांधकाम छप्पर सिमेंट पत्रा | गृहलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेचा रू.९,००००० /- अक्षरी नऊ लाख रूपयेचा बोजा |

**लिलावाच्या शर्ती व अटी -**

१. जाहीर लिलावाच्या शर्ती व अटी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व लिलावाच्या ठिकाणी पहावयास मिळतील.
२. लिलावामध्ये ज्याला बोली बोलावयाची असेल त्यांनी रू. ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार ) मात्र एवढी रक्कम 'अनामत' म्हणून पतसंस्थेकडे लिलावापुर्वी किमान १ तास अगोदर जमा करणे आवश्यक आहे.
३. लिलाव मंजूर करणे अगर काही कारणाने लिलाव तहकूब करणे, रद्द करणे किंवा पुढे ढकलण्याचे सर्व अधिकार पतसंस्थेकडे राहतील.
४. लिलावाच्या तारखेपर्यंत कर्जदार यांनी येणे असलेल्या कर्जाची व्याजासह पुर्ण परतफेड केल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
५. लिलाव करावयाच्या मालमत्तेसंबंधी माहिती अगर कागदपत्रे पतसंस्थेच्या कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यालयात पहावयास मिळतील.
६. अपसेट प्राइज (वाजवी किंमती) पेक्षा कमी किमतीच्या बोली नोंदल्या जाणार नाहीत घर क्र. ३४८ ब ची अपसेट प्राइज रु. २०,२०,१००/- अक्षरी रुपये वीस लाख वीस हजार शंभर रूपये इतकी आहे. घर क्र.५२१ ब ची अपसेट प्राइज रू. ९,६४,५०० /- अक्षरी नऊ लाख चौसष्ट हजार पाचशे रूपये आहे. एकत्रित मुल्य २९,८४,६०० एवढे आहे.

ठिकाण - अलिबाग
दि. २५/०१/२०२३

वसुली अधिकारी
रायगड-अलिबाग

## गृहलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग

मु. त्रिमुर्ती प्लाझा, बी विंग गाळा नं. १०९ पहिला मजला अलिबाग अर्बन बँकेसमोर, ता. अलिबाग जि. रायगड, फोन नं.७७२२०२१७२१

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये

**जाहीर लिलाव नोटीस**

गृहलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग या पतसंस्थेतुन श्रीमती. भावना शंकर पाटील मु.कुरूळ ता.अलिबाग जि.रायगड यांचे कर्ज थकीत झाल्यामुळे यांचे जामिनदार श्री. शंकर रामचंद्र पाटील यांची मालमत्ता कर्जदाराकडील येणे असलेल्या थकीत कर्जाची रक्कम वसुलीसाठी खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये जाहीर लिलावाने विक्री करणे आवश्यक झाले आहे. त्यानुसार सोमवार दिनांक २७/०२ / २०२३ रोजी दुपारी ठिक ११.३० वाजता वसुली अधिकारी हे गृहलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग या संस्थेच्या मुख्य कार्यालयात हजर राहून खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत जाहीर लिलावाने विक्री करतील.

**जाहिर लिलाव करावयाच्या स्थावर मालमत्तेचे वर्णन**

तुकडी व जि. रायगड, पोट तुकडी व ता. अलिबाग रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती ता.अलिबाग हद्दीतील ग्रामपंचायत कुरूळ येथील श्रीमती. भावना शंकर पाटील यांचे जामिनदार श्री. शंकर रामचंद्र पाटील रा. कुरूळ ता.अलिबाग यांची खालील वर्णनची मिळकत

**मालमत्तेचे वर्णन**

| निवाड्याची किंवा आदेशाची तारीख | निवाडा किंवा आदेश ज्या इसमाविरूध्द दिला आहे त्यांची नाव व गावाचे नाव | मिळकत नं. | क्षेत्रफळ | मिळकतीचे वर्णन | शेरा इतर बोजे (नमूद करा) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ८७/१९<br>०८/०२/२०१९ | श्रीमती. भावना शंकर पाटील मु. कुरूळ, ता. अलिबाग जि. रायगड जामिनदार श्री. शंकर रामचंद्र पाटील मु. कुरूळ, | कुरूळ गाव ता. आलिबाग घर क्र. ५२१ अ | २७५ चौ. फुट | पक्के वीट बांधकाम छप्पर सिमेंट पत्रा | गृहलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेचा रू.१०,००००० /- अक्षरी दहा लाख रूपयेचा बोजा |

**लिलावाच्या शर्ती व अटी -**

१ जाहीर लिलावाच्या शर्ती व अटी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व लिलावाच्या ठिकाणी पहावयास मिळतील.
२. लिलावामध्ये ज्याला बोली बोलावयाची असेल त्यांनी रू. ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार ) मात्र एवढी रक्कम 'अनामत' म्हणून पतसंस्थेकडे लिलावापुर्वी किमान १ तास अगोदर जमा करणे आवश्यक आहे.
३. लिलाव मंजूर करणे अगर काही कारणाने लिलाव तहकूब करणे, रद्द करणे किंवा पुढे ढकलण्याचे सर्व अधिकार पतसंस्थेकडे राहतील.
४. लिलावाच्या तारखेपर्यंत कर्जदार यांनी येणे असलेल्या कर्जाची व्याजासह पुर्ण परतफेड केल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
५. लिलाव करावयाच्या मालमत्तेसंबंधी माहिती अगर कागदपत्रे पतसंस्थेच्या कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यालयात पहावयास मिळतील.
६. अपसेट प्राइज (वाजवी किंमती) पेक्षा कमी किमतीच्या बोली नोंदल्या जाणार नाहीत अपसेट प्राइज रु. ९,६४,५००/- अक्षरी रुपये नऊ लाख चौसष्ट हजार पाचशे रूपये इतकी आहे.

ठिकाण - अलिबाग
दि. २५/०१/२०२३

वसुली अधिकारी
रायगड-अलिबाग

**जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा/०४१७/प्र. क्र.२४७/मोप्र-१ दिनांक ३०/११/२०१८.**

**प्रपत्र १**
**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता,**

उच्चालक संकल्पचित्र व निर्मिती विभाग, यांत्रिकी भवन, पहिला मजला, दापोडी, पुणे-४११ ०१२.

ई-मेल : eehdmddpd@gma l.com    दुरध्वनी क्रमांक : (०२०)-२७१४४७२०.

## ई-निविदा सूचना क्रमांक ११ सन २०२२-२०२३.

कार्यकारी अभियंता, उच्चालक संकल्पचित्र व निर्मिती विभाग, दापोडी, पुणे-१२, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम/पात्र कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता बी-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणाली द्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावेत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उच्चालक संकल्पचित्र व निर्मिती विभाग, दापोडी, पुणे. यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत रुपये (वस्तू व सेवा कर वगळून) |
|---|---|---|
| ०१. | हेटवणे प्रकल्पावरील धरणार संरक्षक रेलिंग (chain Link Fencing) निर्मिती करून बसविण्याचे कामाबाबत. | रु. ६९,८२,२४६.००/- |

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी : | दिनांक ३०/०१/२०२३ दुपारी १५.०० पासून दिनांक १३/०२/२०२३ सायंकाळी १७.३० पर्यंत |
| जिओ टॅगिंग करिता की डेटस् | दिनांक ०३/०२/२०२३ पासून दिनांक ०९/०२/२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत |
| ई-निविदा उघडणे: | दिनांक १६/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता. |

**महाराष्ट्र शासन,जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१२१७/प्र.क्र.११४/१७)/यांत्रिकी दिनांक ०५/०७/२०१८ अन्वये करारनाम्यात पश्चात अर्हता निकष समाविष्ट आहेत.**
**खालील संकेतस्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**

http://mahatenders.gov.in. (सदर निविदासूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
कार्यकारी अभियंता, उच्चालक संकल्पचित्र व निर्मिती विभाग, दापोडी, पुणे-१२. यांचे कार्यालयातील सूचना फलक

**जावक क्र.**/उ.स.नि.वि./लेखा-२/निविदा/ ८३-/सन २०२३.
कार्यकारी अभियंता, उच्चालक संकल्पचित्र व निर्मिती विभाग, दापोडी, पुणे-१२, यांचे कार्यालय.
दिनांक: - १९/०१/२०२३.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
उच्चालक संकल्पचित्र व निर्मिती विभाग,
दापोडी, पुणे - ४११ ०१२.

# नवी मुंबईची 'शून्य प्लास्टिक'कडे वाटचाल

## ५१४६ विद्यार्थ्यांनी जमा केले ९६२ किलो प्लास्टिक

**नवी मुंबई : बातमीदार**

'शून्य कचऱ्याचा प्रारंभ माझ्यापासून' या नवी मुंबईतील शाळा-शाळांमध्ये राबविण्यात आलेल्या अभिनव उपक्रमांतर्गत १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत ३२ शाळांतील ५,१४६ विद्यार्थ्यांनी ८,७२० प्लास्टिक बाटल्यांमध्ये तब्बल ९६१ किलोहून अधिक वजनाच्या तुकड्यांच्या स्वरुपातील प्लास्टिक संकलीत केले. या उपक्रमामध्ये सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या शाळा आणि विद्यार्थ्यांचा नवी मुंबई महापालिका मुख्यालयातील म्फीथिएटर येथील विशेष समारंभात गौरव करण्यात आला.




या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त तथा स्वच्छ भारत मिशनचे नमुंमपा नोडल अधिकारी डॉ. बाबासाहेब राजळे, परिमंडळ १ चे उपआयुक्त दादासाहेब चाबुकस्वार, अतिरिक्त शहर अभियंता शिरिश आरदवाड यांच्या हस्ते पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला.

मुलांमध्ये लहान वयापासून स्वच्छतेसोबतच प्लास्टिकचे दुष्परिणाम त्यांना समजून प्लास्टिक प्रतिबंधाविषयी त्यांची मनोभूमिका तयार व्हावी यादृष्टीने शून्य प्लास्टिकची सुरुवात माझ्यापासून हा अभिनव उपक्रम राबविला जात असून या अंतर्गत विद्यार्थ्यांनी पिण्याच्या पाण्याची प्लास्टिक बॉटल घेऊन त्यामध्ये चॉकलेट्सचे रॅपर, वेफर्सचे प्लास्टिक पॅकेट्स, दुधाच्या पिशव्या अथवा सॅशेचे कापलेले तुकडे, प्लास्टिकचे लहान लहान तुकडे जमा करावेत व ती बाटली पूर्ण भरल्यानंतर वर्गशिक्षकांकडे जमा करावी ही या उपक्रमाची कार्यपध्दती आहे.

यामध्ये इतरत्र फेकले जाणारे व सहजपणे दुर्लक्षित होऊ शकेल असे छोट्या छोट्या तुकड्यांच्या स्वरुपातील प्लास्टिक विद्यार्थ्यांमार्फत जमा होऊन पर्यावरणाची संभाव्य हानी टाळली जात आहे. त्यामुळे या आगळ्या वेगळ्या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

या शाळा-शाळांमधून विद्यार्थ्यांमार्फत जमा होणाऱ्या बाटल्या महानगरपालिकेकडे संकलीत केल्या जात असून त्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यात येत आहे. या कामी हार्ट फाऊंडेशन या सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. इलिस जयकर यांच्यामार्फत विशेष योगदान दिले जात असून त्याबद्दल त्यांचाही यथोचित गौरव करण्यात आला.

अशाच प्रकारे प्रत्येक विभाग कार्यालय क्षेत्रातील शाळांमध्ये सर्वोत्तम विभागीय कामगिरी करणाऱ्या प्रत्येक विभागातील एका विद्यार्थ्यास गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे साई होलीफेथ हायस्कुल कोपरखैरणे येथील रिचा पाटील, चार्टर्ड इंग्लिश स्कुल ऐरोली येथील वेदिका वाईरकर आणि टिळक इंटरनॅशनल स्कुल घणसोली येथील दियान कोटियन अशा तीन विद्यार्थ्यांना संपूर्ण नमुंमपा क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी केल्याबद्दल सन्मानीत करण्यात आले. या वेळी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांच्यासमवेत सर्व उपस्थितांनी स्वच्छतेची व प्लास्टिक प्रतिबंधाची सामुहिक शपथ ग्रहण केली.

### महापालिकेकडून तीन शाळांचा सन्मान

'झिरो प्लास्टिक स्टार्ट्स विथ मी २.०' या उपक्रमांतर्गत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रत्येक विभाग कार्यालय क्षेत्रातील शाळांना गौरविण्यात आले. तसेच संपूर्ण नवी मुंबई महापालिका क्षेत्रामध्ये सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या चार्टर्ड इंग्लिश स्कुल ऐरोली, ज्ञानपुष्प विद्यानिकेतन बेलापूर व सेंट ऑगस्टिन हायस्कूल नेरूळ या तीन शाळांना सन्मानित करण्यात आले.

**विद्यार्थ्यांच्या मनावर प्लास्टिक प्रतिबंधाचा स्वकृतीतून संस्कार करण्याचा प्रयत्न शून्य प्लास्टिकचा प्रारंभ माझ्यापासून या अभिनव उपक्रमाची व्याप्ती वाढवून केला जाणार असून यामध्ये नवी मुंबईतील शाळा व्यवस्थापनांनी पुढाकार घ्यावा व जास्तीत जास्त मुले या उपक्रमामध्ये सहभागी होतील यादृष्टीने कार्यवाही करावी.**

**-राजेश नार्वेकर, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

# पनवेल शहर ज्येष्ठ नागरिक संघाचा वर्धापन दिन उत्साहात

## अभिनेते प्रदीप वेलणकर यांची उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्येष्ठ नागरिक संघ पनवेल शहर या संस्थेचा २१वा वर्धापनदिन सोहळा शनिवार (दि. २१) व रविवार (दि. २२) संस्थेच्या नीलाताई पटवर्धन सभागृहात उत्साही वातावरणात झाला. शनिवारी संगीत स्वसम्राज्ञी नाटक सादर करण्यात आले. रविवारी ज्येष्ठ अभिनेते प्रदीप वेलणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

या वेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष जयवंत गुर्जर, उपाध्यक्ष माधुरी गोसावी, सचिव सुनील खेडेकर आदी उपस्थित होते. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून वेलणकर म्हणाले, आपण सेवाकालात बचत केलेली पुंजी निवृत्ती नंतर येणाऱ्या आजारपणासाठी ठेवतो. पण सगळ्यांनाच ती साठवता येत नाही. त्यासाठी ज्येष्ठ नागरिक संघाने तजवीज करावी. त्यादृष्टीने प्रयत्न करावयास हवे, असे प्रतिपादन करुन त्यांनी मुलाखतीतून कलाजीवनाचा जीवनपट उलगडून दाखवला.

विजय जोशी यांनी ही मुलाखत घेतली. कार्यक्रमाचे निवेदनही त्यांनीच केले. या वेळी अमृत महोत्सवी (वय ७५) सभासदांचा सत्कार करण्यात आला. तसेच आजी माजी कार्यकारिणी सदस्य, उपस्थित मान्यवर, पत्रकारांचा गौरव करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष जयवंत गुर्जर यांनी संस्थेची आजपर्यंतच्या वाटचालीची थोडक्यात माहिती दिली. प्रस्ताविक संस्थेचे सचिव सुनील खेडेकर यांनी केले. आभार संस्थेचे सहसचिव भास्कर चव्हाण यांनी मानले. या कार्यक्रमाला बहुसंख्य सभासद ज्येष्ठ पत्रकार अनंत सिंगासने, दिलीप रेडकर व दत्तात्रय जाधव आदी उपस्थित होते. पसायदानाने व स्नेहभोजनाने या सोहळ्याची सांगता झाली.

# चिरनेरमध्ये आज माघी गणेशोत्सव

**उरण : वार्ताहर**

माघी गणेशोत्सवा निमित्ताने उरण तालुक्यातील ऐतिहासिक चिरनेर गावातील अत्यंत प्राचीन अशा श्री महागणपती मंदिरात येणाऱ्या लाखो भाविकांची गर्दी लक्षात घेऊन मंदिर प्रशासनासह चिरनेर ग्रामस्थ, चिरनेर ग्रामपंचायत प्रशासन व पोलीस प्रशासन या सर्वांनी भक्तांच्या स्वागतासाठी जय्यत तयारी केली आहे.



गणेश भक्तांच्या स्वागतासाठी चिरनेरच्या विविध सार्वजनिक मंडळांच्या माध्यमातून जागोजागी स्वागत फलक उभे केले आहेत. तसेच विविध महत्त्वाच्या ठिकाणी स्वागत कामानीदेखील उभारल्या गेल्या आहेत. माघी गणेशोत्सवाच्या निमित्ताने श्रींच्या जन्मोत्सवाच्या मुख्य दिवशी श्रींची महापूजा व अभिषेकाचा कार्यक्रम सकाळी ३.३० वाजता होणार आहे. त्यानंतर ११.३० वाजता श्रींच्या जन्मोत्सवाच्या कीर्तनाला सुरुवात होईल. दरम्यान, चिरनेर गावातील सार्वजनिक गणेश मंडळे, सामाजिक मंडळे, नाट्य मंडळे व क्रीडा मंडळे तयारीच्या दृष्टिकोनातून सज्ज झाली असून, परिपूर्ण सुसज्ज नियोजनासाठी सारेच तयारीला लागले आहेत.

श्री महागणपतीला वर्षभर राज्याच्या व देशाच्या विविध प्रांतांच्या कानाकोपऱ्यातून भाविक गणेशभक्तागण दर्शनासाठी येत असतात. माघ गणेशोत्सव हा प्रचंड मोठा उत्सव होत असून, संपूर्ण चिरनेर गाव भाविक भक्तगणांनी फुलून निघते.



# बामणडोंगरी रेल्वे स्टेशन येथे स्वच्छता मोहीम

**उरण : बातमीदार**

श्री संत वामनभाऊ भगवानबाबा सेवा ट्रस्टच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असतात. त्यानुसार रविवारी (दि. २२) बामणडोंगरी रेल्वे स्थानक येथे स्वच्छता मोहीम शिबिर आयोजित केले होते.

या स्वच्छता शिबिरामध्ये ट्रस्ट मधील सर्व सदस्य तसेच समाजातील ज्येष्ठ आणि सर्व वडीलधाऱ्या मंडळीने तसेच लहान मुलांनी हि सहभाग नोंदवला व रेल्वे स्थानकाचा परिसर स्वच्छ केला. पुढील काही काळात असेच समाज उपयोगी कार्यक्रम घेण्याचा आणि समाजाचा माध्यमातून पूर्णत्वास नेण्याचा श्री संत वामनभाऊ संत भगवानबाबा सेवा ट्रस्ट चा संकल्प आहे.

# पांडुरंग आमले यांची भाजयुमोच्या नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा नोडमधील समाजसेवक पांडुरंग आमले यांची भारतीय जनता युवा मोर्चाच्या नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. गेली काही वर्षे सामाजिक कार्यातून जनसामान्यांत भाजपसाठी काम करणाऱ्या पांडुरंग आमले यांच्या कार्याची भाजपकडून दखल घेण्यात आली असून त्यांची पोचपावती त्यांनी भाजयुमोच्या माध्यमातून देण्यात आल्याचे बोलले जात आहे.

कोरोना महामारीच्या काळात दोन वर्षे पांडुरंग आमले यांनी सातत्याने जनताभिमुख कामे करत जनतेत राहून जनतेला दिलासा देण्याचा प्रयत्न केला. कोरोना महामारीच्या अगोदर, कोरोना महामारीत व कोरोना महामारीतही पांडुरंग आमले सानपाडा नोडमध्ये कार्यरत राहील्याने त्यांची सानपाडावासियांत चांगली प्रतिमा निर्माण झाली आहे. स्थानिक आमदार मंदा म्हात्रे यांच्या निकवर्तीय समर्थकांमध्ये पांडुरंग आमले यांची गणना होत असून मंदा म्हात्रे यांचे विश्वासू म्हणून सानपाडा नोडमध्ये त्यांची प्रतिमा आहे.

आमदार म्हात्रेंच्या माध्यमातून आमले सातत्याने सानपाडा नोडमधील समस्या सोडवत आले आहेत. त्यांच्या निवडीबद्दल आमदार म्हात्रेंपासून ते भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, सानपाडा नोडमधील विविध गृहनिर्माण सोसायटीतील पदाधिकारी व रहिवाशी व अन्य सामाजिक संस्थांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी

**नवी मुंबई : बातमीदार**

नेताजी सुभाषचंद्र बोस स्मृति संस्थानद्वारे नेताजींच्या १२६व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी चित्रपट अभिनेते आणि उत्तर भारतीय नेते एस.सी. मिश्रा यांनी आपले मत व्यक्त केले.



कार्यक्रमापूर्वी वाशी येथील नेताजी चौक, सेक्टर १७ येथे सुप्रसिद्ध वकील आणि सामाजिक कार्यकर्ते रमेश त्रिपाठी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. जिथे अनेक देशभक्त आणि नेताजींचे अनुयायी उपस्थित होते. या कार्यक्रमादरम्यान माजी कॅप्टन आणि सामाजिक कार्यकर्ते पी.पी. सिंग यांनी नेताजींचा आदर्श व पावलावर पाऊल ठेवण्याचा सल्ला दिला, तर डॉ. एन. के. उपाध्याय यांनी २०१६ मध्ये लेखक विरा हिल्डब्रँड यांनी नेताजींच्या सैन्यातील महिला ब्रिगेडवर लिहिलेल्या पुस्तकाची सविस्तर माहिती दिली.

या वेळी ज्येष्ठ पत्रकार सुरेश वडवळकर, नारायण जाधव, संत निरंकारी मिशनचे अधिकारी काळुंगडे एस. आय., कवी व लेखक संतोष पांडे, जनकल्याण समाज संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश शर्मा, नवी मुंबई उपाध्यक्ष पंकज नरवणकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी कमलेश एस. राजपूत यांनीही मनोगत व्यक्त केले.

जनकल्याण सामाजिक संस्थेचे सरचिटणीस सुरेंद्र सरोज, प्रभारी बलदेव सिंग, नवी मुंबई अध्यक्ष मफतलाल चव्हाण, दिनेश चव्हाण, पत्रकार रामप्रीत रॉय, परमानंद सिंह, उपाध्यक्ष संतोष बाबर, शिवसैनिक संजय मेढकर, शिवसैनिक संतोष नलावडे, प्रशांत अहिर, सचिन जैन, विजय नायर आदी उपस्थित होते.सूत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार व संस्थेचे अध्यक्ष विनोद प्रधान यांनी केले.

# पनवेलमध्ये माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**उरण : बातमीदार**

शाळेतील गोड आठवणींना उजाला देण्यासाठी न्यू इंग्लिश स्कूल विन्हेरे महाड, इयत्ता १० वी बॅच सन १९८७ यांनी प्रथम स्नेह संमेलन पनवेल येथील हॉटेल पार्क इन येथे आयोजीत केले होते.



मैत्रीच्या ओढीने जवळ जवळ सर्वजण पुणे, ठाणे, मुंबई- महाड येथून आले होते. या संमेलनात या मित्रांनी त्याच्या गुरुजनांना बोलवून त्यांचा यथोचित आदर सत्कार केला. व त्यांच्या प्रती असलेली आपली कृतज्ञता व्यक्त केली. सर्वांनी आपापली ओळख करून दिली. खूप मजा मस्ती करत जुन्या आठवणीत रमत हे स्नेहसंमेलन आनंदात पार पाडले.

पुन्हा एकदा या मित्रपरिवाराने स्नेहसंमेलन त्याच उत्साहात पुष्प वाटिका रिसॉर्ट, पाले बुद्रुक, पडगा जवळ, पनवेल येथे आयोजीत करण्यात आले होते. हे स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी सर्वच मित्रांनी अथक परिश्रम घेतले. दरवर्षी या स्नेह संमेलनाला सर्वच मित्रांचा उत्तम प्रतिसाद मिळत असतो, असे नितीन गावंड यांनी या वेळी सांगितले.

# कडाक्याच्या थंडीत शेकोटीची ऊब!

**उरण : वार्ताहर**

काळाच्या ओघात ग्रामीण भागातून, शेकोटी संस्कृती हद्दपार झालेली असताना, पुन्हा एकदा थंडीमुळे शेकोटी पेटविण्याची वेळ येऊन ठेपली आहे. एकेकाळी आजी आजोबांसह बच्चे कंपनीला शेकोटीची अन् मायेची उब अनुभवायची मजा काही वेगळीच होती.



पूर्वी थंडीचा बचाव करण्यासाठी मुबलक प्रमाणात उबदार कपडे मिळत नव्हते, मात्र जंगलात लाकूड मोठ्या प्रमाणात मिळत असे. परंतु काळाच्या ओघात जंगले नामशेष होत चालली आहेत. अंगावर परिधान करण्यासाठी गरम कपडे आल्याने, या शेकोटीकडे तरुणाई पाठ फिरवीत आहे. ही खरी वस्तुस्थिती आहे, मात्र सकाळ संध्याकाळ गारव्यासह धूसर धुक्याची चादर दृष्टीस पडत आहे. आदीमानवापासून शेकोटीची प्रथा प्रचलित आहे. शेकोटीमुळे नैसर्गिक ऊब मिळते.

थंडी पडू लागली की ग्रामीण भागात थंडीच्या दिवसात ठीकठिकाणी शेकोट्या पेटलेल्या दिसायच्या. या वेळी गप्पा गोष्टी, गाणी, रुढी परंपरा, वडीलधाऱ्यांचे जीवनानुभव आदी संस्कारांची शिदोरी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक पद्धतीने संक्रमित करण्याची पद्धत होती. काही वर्षांपासून, ग्रामीण भागात आधुनिकतेचा शिरकाव झाला, आणि जीवन पद्धतीत बदल झाला. संयुक्त कुटुंब व्यवस्थेचा ऱ्हास यामुळे ग्रामीण भागातील शेकोटी संस्कृती आता कालबाह्य होत चालली आहे. त्याचबरोबर माती उत्खनन, बेसुमार वृक्षतोड आदी घटकांमुळे शेकोटी संस्कृती हद्दपार झाली आहे.

# नेरूळमध्ये अखंड हरिनाम सप्ताह



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ जगद्गुरू तुकोबाराय सेवा मंडळ, नेरूळ आयोजित अखंड हरिनाम सप्ताह तथा ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा श्री क्षेत्र देहू मंदिर, आळंदी अध्यक्ष हभप गुरुवर्य पांडुरंग महाराज घुले यांच्या मार्गदर्शनाखाली झाला.

प्रारंभी, सप्ताहात सकाळी काकड भजन, हरिपाठ आणि कीर्तन त्यानंतर आळंदी देवाची प्रमुख हभप सुभाष महाराज उबाळे यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. या वेळी हभप गुरुवर्य पांडुरंग महाराज घुले यांचे प्रवचन झाले.

सप्ताह यशस्वी होण्यासाठी भाजप नेरूळ तालुका अध्यक्ष व संतश्रेष्ठ जगतगुरू तुकोबाराय सेवा मंडळाचे अध्यक्ष राजुशेठ तिकोने, बाळासाहेब हिंगे, संजीवन आवटे, गोरखनाथ पाटील वसंत जगताप, यशवंत गोपाळे यासह अखंड हरिनाम सप्ताह कमिटी २०२३ पदाधिकारी व सदस्यांनी मेहनत घेतली.

# रायगड विभागीय वक्तृत्व स्पर्धेत गव्हाण विद्यालयाचे सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्या प्रबोधिनीच्या वतीने घेण्यात येणाऱ्या रायगड विभागीय वक्तृत्व स्पर्धेत पुन्हा एकदा गव्हाण विद्यालय झळकले. संस्थेच्या नावडे येथील शाखेत झालेल्या विभागीय वक्तृत्व स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी रायगड विभागीय वक्तृत्व स्पर्धेत चमकदार यश संपादन केले.



मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषांतून झालेल्या गटनिहाय स्पर्धेत लहान गटात गव्हाण विद्यालयाची गौरी दुर्गाराम चौधरी या विद्यार्थिनीने हिंदी भाषेत प्रथम क्रमांक पटकाविला. याच गटात स्मीत कुंदन मोकल या विद्यार्थ्यांने मराठी भाषेत दुसरा क्रमांक प्राप्त केला. तर इंग्रजी भाषेत अनुष्का राजेंद्र आव्हाड हिला चौथा क्रमांक प्राप्त झाला.

माध्यमिक गटात मराठी भाषेत दीक्षा रमेश वर्तक व हिंदी भाषेत मंजिता धर्मेंद्र गोस्वामी या विद्यार्थिनींनी द्वितीय क्रमांक तर उच्च माध्यमिक गटात रूपाली वैजिनाथ मंजुळकर या विद्यार्थिनीने इंग्रजी भाषेत तृतीय क्रमांक प्राप्त केला.

संस्थेच्या रायगड विभागीय कार्यालयाचे विभागीय अधिकारी रोहिदास ठाकूर व सहायक विभागीय अधिकारी शहाजीराव फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली नावडे येथील विद्यालयात या स्पर्धा झाल्या. गव्हाण शाखेचे ज्युनिअर कॉलेज विभागाचे प्रा. राजेंद्र चौधरी, माध्यमिक विभागाचे प्रसन्न ठाकूर व लहान गटासाठी हर्षला पाटील या तीन शिक्षकांना मराठी भाषेसाठी विभागीय स्पर्धेत परीक्षक म्हणून काम करण्याची संधी मिळाली.

विजेत्या स्पर्धकांना विद्यालयाचे प्राचार्य आणि रायगड विभागीय सहायक विभागीय अधिकारी शहाजीराव फडतरे व गव्हाण शाखेचे उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, नावडे शाखेचे उपमुख्याध्यापक गोडगे सर, पर्यवेक्षक मोहिते सर, एच.एन.पाटील, नावडे शाखेचे लेखनिक शिर्के सर, आय.टी.आय. चे ताटे सर तसेच प्रा.सौ. ठाकूर व अन्य मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आली. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभासाठी संस्थेचे लाईफ मेंबर व न्हावे शाखेचे शाखाप्रमुख प्रमोद कोळी उपस्थित होते.

सर्व विजेत्या स्पर्धकांना मार्गदर्शन करणारे भाषाध्यापक तसेच विद्यालयाच्या वक्तृत्व स्पर्धा विभागाचे प्रमुख सागर रंधवे, सहायक यु.ए.म्हात्रे व हर्षला पाटील, ज्युनिअर कॉलेजचे स्पर्धाप्रमुख प्रा. राजेंद्र चौधरी व सहायक प्रा. जयवंती ठाकूर आदींनी परिश्रम घेतले.

सर्व विजेते स्पर्धक व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन होत आहे. वक्तृत्व व गायन स्पर्धेतील सर्व विजेत्यांचा विद्यालयाच्या प्रांगणामध्ये सर्व विद्यार्थ्यांसमोर सन्मान करण्यात आला.

## निवडक



### म्हसळा वाचनालयात जयंती साजरी

**म्हसळा** : सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांची जयंती सार्वजनिक वाचनालय येथे सोमवारी (दि. २३) साजरी करण्यात आली. या वेळी वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे, सुनील उमरोटकर, महादेव पाटील, बाळासाहेबांची शिवसेना तालुकाध्यक्ष प्रसाद बोर्ले, उपाध्यक्ष प्रविण विनोद बनकर शहराध्यक्ष अमर रविंद्र करंबे, दिलीप कोबनाक, कृषी विभागाचे वरीष्ठ लिपीक व्हि. सी. सोनावणे, धनंजय सरनाईक, जि. व्हि. देवडे, रेणूका पाटील, दिपाली पालवे, अरविंद शिंदे, नामदेव घुमकर, हरिश्चंद्र नावत्ती, उदय करडे, सायली चोगले, प्राची मेंदडकर आदी उपस्थित होते.

### उद्योजक सुहास मेहता यांना पुरस्कार



**महाड** : सहकार महर्षी स्व. अण्णासाहेब सावंत यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून पर्ण फाउंडेशनतर्फे स्व. अण्णासाहेब सावंत गौरव पुरस्कार उद्योजक सुहास मेहता यांना प्रदान करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाच्या सभागृहामध्ये पुरस्कार सोहळ्याचे रविवारी (दि. २२) आयोजन करण्यात आले. या सोहळ्याला प्रसिद्ध सिनेनाट्य निर्माते पुरुषोत्तम बेर्डे विशेष अतिथी म्हणून, प्रमुख अतिथी म्हणून आमदार भरत गोगावले, आमदार आदिती तटकरे, लोकविकास सामाजिक संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब जगताप, शोभाताई सावंत, पद्मश्री डॉ. हिम्मतराव बावस्कर, बालरोग तज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर दाभाडकर, डॉ. संजीव गोखले, पर्ण संस्थेचे विश्वस्त मानसी मराठे, शिवराज सावंत, डॉ. प्रभाकर जाधव, संजय भुस्कुटे उपस्थित होते.

### आजपासून लायन्सचा अलिबाग फेस्टीवल

**अलिबाग** : लायन्स क्लब ऑफ अलिबागच्या वतीने २५ ते २९ जानेवारीला अलिबाग फेस्टीवलचे आयोजन करण्यात आले आहे. पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. नवउद्योजकांनी व्यवासायाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासासठी १८० स्टॉल्स यानिमित्ताने उपलब्ध करून दिले जाणार असल्याची माहिती फेस्टीव्हल कमिटीचे अध्यक्ष संजय पाटील यांनी दिली. दरवर्षी जानेवारी महिन्यात या महोत्सवाचे आयोजन केले जाते. अलिबाग समुद्रकिनाऱ्यावरील मोकळ्या मैदानात महोत्सव होणार असून पार्कींगची व्यवस्था केली जाणार आहे. या महोत्सवात सालाबादप्रमाणेच कराओके गायन स्पर्धा, पाककला स्पर्धा, शरीर सौष्टव, फॅशन शो, हेअर अँण्ड मेकअप शो यासारख्या स्पर्धांचा समावेश असणार आहे.खाद्यपदार्थ, विविध वस्तू, कपडे, बँका, विमा कंपन्यांचे स्टॉल्सचा यात सहभाग असणार आहे. अलिबागकरांनी या फेस्टीव्हलमध्ये मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा असे आवाहन लायन्स क्लबतर्फे या वेळी करण्यात आले.

# म्हसळ्यात दाट धुक्याची चादर

## आंबा, कडधान्य पिकाला अतिथंडीमुळे धोका

**म्हसळा : संजय खांबेटे**

गेल्या काही दिवसांपासून म्हसळ्यासह सर्वत्रच थंडीचे प्रमाण वाढले आहे. म्हसळा शहरात पहाटेपासून सकाळी सुमारे ८ वाजेपर्यंत धुक्याची चादर पसरलेली असते. सकाळच्या वेळीही तपमान किमान १८ तर कमाल २६ अंश सेल्सिअस असते. थंडवाऱ्यामुळे नागरिकानी या गुलाबी थंडीचा आनंद घेतला, सकाळी शेगोटीचा आनंद काही मंडळी लुटत आहेत, तर दुसऱ्या बाजूला तालुक्यातील आंबा-काजू उत्पादक फळबागायतदार आणि रब्बी हंगामामधील कडधान्य पिक घेणारे शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत.सध्या



७० टक्के झाडांना पालवी, काहींना मोहोर प्रक्रिया तर पाभरा पंचक्रोशीतील काही झाडांना लहान आकाराच्या फळांची लागण झाली आहे. सततच्या थंडीमुळे मोहोर-फलधारणा उशिराने होणार असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.

मध्यंतरीच्या ढगाळ हवामानामुळे तुडतुड्यांचा तसेच काही ठिकाणी थ्रीप्सचाही प्रादुर्भाव झाला. त्यामुळे किटकनाशकांची फवारणी करावी लागणार आहे. त्यातच थंडीमुळे पहिल्याच बहरांत मोहोर आलेल्या झाडांना पालवी आल्याने फळाची लागण योग्य तऱ्हेने झाली नाही. तालुक्यांत आंबा पिकाखाली क्षेत्र २१०० हेक्टर आहे, तर तृणधान्याखाली क्षेत्र १७० हेक्टर आहे. त्यामध्ये वाल, चवळी, हरभरा, मूग, उडीद, मटकी, ही पिके घेतली जातात. सततच्या लहरी हवामानामुळे पिकांच्या देखभालीचा खर्च ५०ते ६० टक्के वाढणार आहे. भारतीय हवामान खात्याने नोंदविलेल्या निरीक्षणानुसार आगामी चार दिवस तापमानात चढ-उतार अनुभवास येईल. हवामानाचा हा लहरीपणा आता आणखी काही दिवस शेतकऱ्यांना सोसावा लागणार आहे.

> **मोहर व फळधारण्याच्या अवस्थेत आंबा पिकावर तुडतुड्याचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. अशा अवस्थेत इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के तीन मिली प्रति दहा लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी**
>
> **-आर. ए. ढंगारे, तालुका कृषी अधिकारी, म्हसळा**

## खालापुरातील बेपत्ता मुलाचा १२ तासांत शोध

**खालापूर : प्रतिनिधी**

एटीएममधून पैसे काढण्यासाठी पालीफाटा येथे जातो सांगून बेपत्ता झालेल्या १६ वर्षीय मुलाचा खोपोली पोलिसांनी अवघ्या १२ तासांत शोध घेऊन मुलाला पालकांच्या हवाली केले.

देवन्हावे-खालापूर येथील ज्ञानेश्वर पाटील यांचा मुलगा आदित्य (वय १६) एटीएममधून पैसे काढण्यासाठी पालीफाटा येथे जातो असे सांगून निघाला. संध्याकाळी उशिरापर्यंत न आल्याने त्याचा आजूबाजूच्या गावात, मित्रांकडे शोध घेऊन तो मिळून न आल्याने पालकांनी अपहरण झाल्याची तक्रार खोपोली पोलीस ठाण्यात दिली. खोपोली पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार संतोष रूपनवर, विकास पाटील यांनी आदित्यचा तपास सुरू केला. आदित्यचे भ्रमणध्वनीचे ठिकाण तांत्रिक तपास करून तो मुंबईत असल्याचे समजल्यानंतर पोलिसांनी रातोरात मिळालेल्या तांत्रिक माहितीच्या आधारे आदित्यचा शोध घेतला. आदित्यला सुखरूप पालकांच्या ताब्यात देण्यात आले आले.

अज्ञात व्यक्तीने फूस लावून नेल्याची माहिती पोलिसांनी दिली असून पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास हवालदार संतोष रूपनवर करीत आहेत.

## कर्तव्य बजावताना माणुसकी जपा -डॉ. भूषणकुमार उपाध्याय

**अलिबाग : प्रतिनिधी**

होमगार्डसनी कर्तव्य बजावत असताना माणुसकी जपावी. समाजोपयोगी कार्य करावे, आपल्या कामातून कर्तृत्व सिद्ध करा. आपल्या आरोग्याचीदेखील काळजी घ्या. नियमित व्यायाम करा, असा सल्ला महाराष्ट्र राज्य होमगार्ड महासमादेशक डॉ. भूषणकुमार उपाध्याय यांनी होमगार्डसना दिला.

राज्याचे होमगार्ड महासमादेशक डॉ. भूषणकुमार उपाध्याय यांनी सोमवारी (दि. २३) गोंधळपाडा येथील रायगड जिल्हा होमगार्ड कार्यालयास भेट दिली. त्या वेळी ते बोलत होते. त्यांना केंद्र नायक जनार्दन पवार



यांच्या नेतृत्वाखालील रायगड होमगार्डसच्या वतीने १ अ २०चा सन्मानगार्ड मानवंदना देण्यात आली. या वेळी रायगड पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे व होमगार्डचे जिल्हा समादेशक तथा पोलीस अपर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे उपस्थित होते. मान्यवरांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. जिल्हा नियोजन समितीकडून होमगार्ड कार्यालयास मंजुर झालेल्या निधीतून कवायत मैदान सपाटीकरण कामाचा शुभारंभ करण्यांत आला.

प्रशंसनीय कामगिरी बजावलेल्या होमगार्ड जवानांचा प्रशंसापत्र देऊन महासमादेशक डॉ. भुषण कुमार उपाध्याय यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अपर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे यांनी रायगड जिल्हयात होमगार्डस करीत असलेल्या कामगिरीची माहिती दिली. महासमादेशक यांनी होमगार्डसना मिळवून दिलेल्या विमासंरक्षण योजनेमुळे होमगार्ड लक्ष्मण आखाडे यांना २५ लाखांचा विमा मिळाला, अशी माहिती दिली. रायगड पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी होमगार्ड बजावत असलेल्या कामगिरीचे कौतुक केले.

कंपनी नायक न. ल. पाटील व कर्जत पथक होमगार्ड प्रेरणा भालेराव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन गणेश कदम, सामुग्री प्रबंधक सुभेदार, होमगार्ड रायगड यांनी केले. प्रशासिक अधिकाऱ्यांनी आभार प्रदर्शन केले.

# दाखणे येथे महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

दाखणे ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच विश्वास उभारे यांच्या संकल्पनेतून स्थानिक व गावातीलच मुंबईस्थित महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ व खेळ पैठणीचा हा कार्यक्रम रविवारी (दि. २२) उत्साहात झाला.




या कार्यक्रमास शिवसेना विधिमंडळ पक्षप्रतोद आमदार भरत गोगावले, युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, माजी जि. प. सदस्या अपर्णा घोसाळकर, महिला आघाडी जिल्हा संघटक निलिमा घोसाळकर आदी उपस्थित होते. आमदार भरत गोगावले यांनी सरपंच विश्वास उभारे यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. या वेळी ग्रामस्थ, महिला व मुंबईकर मंडळ दाखणे यांचे वतीने बाळासाहेबांची शिवसेना-युवासेना दक्षिण रायगड जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांचा सत्कार करण्यात आला.

खेळ पैठणीचा या कार्यक्रमात एकूण २१ पैठण्यांचे बक्षिस ठेवण्यात आले होते. दिवसभर महिलांनी विविध खेळांमध्ये सहभाग घेऊन मनमुरादपणे खेळाचा आनंद लुटला. रुढी आणि परंपरेच्या बंधनात असलेल्या विधवा महिलांना मोकळा श्वास घेता यावा, स्वाभिमान आणि सन्मानाने जगता यावे यासाठी विधवा महिलांनासुद्धा कार्यक्रमात विशेष आमंत्रित करून त्यांना हळदी-कुंकवाचा मान व वाण देऊन सन्मानित करण्यात आले.

ग्रामपंचायत हद्दीतील मागासवर्गीय व आदिवासी भगिनींनीसुद्धा या कार्यक्रमात सहभाग घेतला. या कार्यक्रमास ग्रामस्थ मंडळ दाखणे अध्यक्ष गणपत उभारे, मुंबई मंडळ अध्यक्ष आकाश उभारे, महिला मंडळ अध्यक्षा संगीता पानवकर, माजी सरपंच दिलीप उभारे, शिवसेना महिला संघटिका मुंबई रेखा मुंढे, कार्याध्यक्ष वसंत उभारे, ग्रामपंचायत सदस्य सिताराम उभारे, सुनिल नाडकर, संजना करकरे, संस्कृती शिर्के, राजू शेडगे, निलेश खडतर, विकास मोरे, संतोष सावंत, शाखाप्रमुख संतोष उभारे, उपशाखाप्रमुख दिनेश उभारे, ग्रामस्थ उपस्थित होते. पैठणी विजेत्या रसिका उभारे, वर्षा मोरे, संस्कृती शिर्के, रेखा आवाद, यसिका जाधव, मेघना मुंढे, विद्या उभारे, वैशाली नाडकर, प्रमिला राणे, निकिता शेलार, नंदिनी नाडकर, जयश्री करकरे, सुमन पवार, दिव्या मुंढे, वृषाली उभारे, रंजना उभारे, मामिता पवार, शीतल मुंढे, कल्याणी शेडगे, अनिता शिर्के, लक्ष्मी कानडे आदींचा सन्मान करण्यात आला.

# मुगवलीचा श्री स्वयंभू गणपती भाविकांचे श्रद्धास्थान



### श्री गणेश जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र मुगवली येथील श्री स्वयंभू गणपती मंदिरात बुधवारी (दि. २५) श्रींचा जन्मोत्सव आयोजित करण्यात आला आहे. मुंबई-गोवा महामार्गावर माणगावपासून तीन किमी अंतरावर मुगवली फाटा आहे. तेथून अवघ्या दिड किमी अंतरावर मुगवलीचे स्वयंभू गणेश मंदिर आहे.

यादिवशी सकाळी ७ ते ९ वाजता श्री मूर्ती महापूजा (अभिषेक) उपाध्याय राजू श्रीकृष्ण पंडित गोरेगाव, सकाळी ११ वाजता कीर्तन भूषण हभप ज्ञानेश्वर मुरलीधर कपलाने (आळंदीकर), दुपारी १२:४० वाजता श्री गणेश जन्म, दुपारी १ वाजता ढेपेताई व जिजामाता शिर्के, रेश्मा खाडे, संजीवनी भोजने नवनाथ सत्संग मंडळ माणगाव यांचे भजन, दुपारी २ वाजता श्री गणेश यागारंभ, सायंकाळी ७:३० वाजता यागपूर्णाहुती, रात्री १२:३० वाजता महानेवैद्य, महाआरती व प्रसाद असे कार्यक्रम होणार आहेत. या कार्यक्रमांचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री स्वयंभू गणपती मंदिर विश्वस्त मंडळ अध्यक्ष तुकाराम म्हस्के, उपाध्यक्ष विठोबा म्हस्के, सचिव राजेंद्र म्हस्के, खजिनदार महादेव म्हस्के, सदस्य मिलिंद म्हस्के, नथुराम म्हस्के, नितीन म्हस्के, सुरेश म्हस्के, सीताराम म्हस्के, प्रकाश तेटगुरे, शांताराम वाघोस्कर, व्यवस्थापक स्वयंभू स्वयंसेवक व ग्रामस्थ मंडळी मुगवली यांनी केले आहे.

मुगवली हे १०० ते १२५ घरांचे छोटे गाव आहे. सुमारे ३२५ वर्षांपूर्वी मुगवलीच्या परिसरातील एका शेतात एक शेतकरी नांगरणी करीत होता. अचानक शेतातील एका दगडास नांगराचा फाळ लागून तेथून रक्त येऊ लागले. हे पाहून त्या शेतकऱ्याने गावाकडे धाव घेऊन घडलेली सर्व हकीकत गावकऱ्यांना सांगितली. सर्व ग्रामस्थांनी याबाबत गोरेगावच्या जाणकारांचा सल्ला घेतला व हे गणेशाचे स्वयंभू महास्थान आहे, असे त्यांनी सांगितल्यावर ग्रामस्थांनी ती जागा स्वच्छ केली. त्यानंतर सर्वांनाच नैसर्गिक अवस्थेतील गणेशाचे मोहक दर्शन झाले. ही मूर्ती जमिनीतून वर आलेल्या दोन फूट लांबी-रुंदीच्या पाषाणावर नैसर्गिक अवस्थेत असून, मस्तक, उभी वळलेली सोंड, पोट अशा स्वरुपाची आहे. मागील बाजूस सिंह असून, त्यास पाठ टेकून खाली पाय सोडून तो बसलेला आहे. गणेशाचे नेत्र नैसर्गिक अवस्थेत असल्यामुळे त्याचे डोळे बोलके वाटतात. सर्व ग्रामस्थांनी व परिसरातील नागरिकांनी सुप्तावस्थेत असलेल्या या जागृत गणेशासाठी सुरुवातीस एक कुडाचे मंदिर उभारले. त्यानंतर प्राचीन काळातील या मंदिराचा ३५ वर्षांपूर्वी जीर्णोद्धार करून गाभाऱ्यात संगमरवरी दगड बसविण्यात आला व मंदिरही थोडे प्रशस्त करण्यात आले.

१९६८ साली मुगवलीच्या स्थानिक स्वयंभू गणेश मंडळाने व्यवस्थापन समिती स्थापन करून श्रींच्या भोवती छोटासा गाभारा बांधला आणि दररोजच्या गणेशपुजेची व्यवस्था केली. पूर्वीच्या जुन्या कौलारू मंदिराचे रुपांतर आता भव्य सुंदर मंदिरात झाले आहे. मंदिराचे शिखर मुंबई-महाड महामार्गावरील मुगवली फाट्याजवळूनही दिसते. येथील गणेश हा पूर्वीभिमूख आहे. त्यामुळे गणेशाच्या मूर्तीवर दररोज सूर्यकिरण पडावेत, अशीही कल्पकता मंदिर बांधताना योजण्यात आली आहे.

## जलजीवन मिशन अंतर्गत प्रजासत्ताक दिनी विशेष ग्रामसभा

**अलिबाग : प्रतिनिधी**

हर घर जल हर घर नल या उपक्रमास लोकसहभाग व पारदर्शकता मिळवून देण्यासाठी विविध स्तरावर व्यापक प्रचार, प्रसिद्धी देण्याचे काम सुरू आहे. त्या अनुषंगाने प्रजासत्ताक दिनी (दि. २६) जलजीवन मिशन अंतर्गत विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.

केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयाचे माध्यमातून सन २०१९पासून जलजीवन मिशन हा एक महत्त्वांकाक्षी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या अभियानांतर्गत ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना विहीत गुणवत्तेसह, पुरेसे व नियमित स्वरुपात पाणी पुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. मार्च २०२४ अखेरपर्यंत संपूर्ण जिल्हा हा हर घर नल से जल म्हणून घोषित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. याची माहिती या विशेष ग्रामसभेत देण्यात येणार आहे.

ग्रामसभेदरम्यान ग्रामपंचायत सदस्यांसोबत ग्रामआरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या सदस्यांना आमंत्रित करुन विशेष स्थान देण्यात येऊन व समिती सदस्यांची ओळख तसेच त्यांच्या अधिकार व जबाबदारीबाबत उपस्थित ग्रामस्थांना अवगत करणेत येणार आहे. पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षणांतर्गत पाणी गुणवत्ता चाचणीसाठी प्रशिक्षित केलेल्या पाच महिलांना सभेस आमंत्रित करून सन्मानित करण्यात येणार आहे, तसेच प्रत्येक गावातील पाणी गुणवत्ता निरीक्षक महिलांची संपर्क क्रमांकासह नावे गावातील सार्वजनिक ठिकाणी ठळकपणे प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.

ग्रामसभेदरम्यान जलजीवन मिशन अंतर्गत मंजूर योजनेची सविस्तर माहिती जसे योजनेचे उद्दिष्ट, योजनेतील समाविष्ट उपांगे, मंजूर निविदेची रक्कम, योजनेचा कालावधी, कंत्राटदारांचे नाव, नळ जोडणीची सद्यस्थिती इ. तसेच प्रगतीत असलेल्या व पूर्ण झालेल्या कामांची माहिती देण्यात येणार आहे.

जलजीवन मिशनच्या अनुषंगाने पाणी व स्वच्छता या प्रमुख घटकांवर लोकांमध्ये जनजागृती करून ग्रामस्तरावरील सर्व विकास योजनांच्या माहितीबाबत ग्रामसभेत ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्या प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी दिली.

## भिलजी बोरघर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची वाहतूक सुरक्षा रॅली

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील भिलजी बोरघर येथील बामिबाई नाना पुनकर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची वाहतूक सुरक्षा रॅली बोरघर ते रामराज अशी रॅली काढण्यात आली. या वेळी रेवदंडा पोलीस निरीक्षक देवा मुपेडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

वाहतूक सुरक्षा रॅलीत हायस्कूलच्या आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी वाहने वेगात चालवू नका, मानव जन्म पुन्हा नाही, वेगाने वाहने चालवून मुत्यूस आमत्रंण देऊ नका, कदर व्हावया तुमच्या प्राणाची, आदर करा रस्ता सुरक्षा नियमाची, होईल दोन मिनिटांचा उशीर, पण जीवन राहील सुरक्षीत, आवर वेगाला सावर जीवाला, पाळूया निर्बंध रहदारीचा करूया प्रवास




आनंदाचा, वाहने आहेत चालवण्यासाठी नव्हे अपघात करण्यासाठी, दारू पिऊन वाहने चालवितो यमराज त्याला हाक मारतो, वीजेशी खेळ करू नका तुमचे आयुष्य धोक्यात टाकू नका, जो नेहमी सावध राहिल तोच जगापासून सुरक्षित राहिल, तुमचं संरक्षणही तुमच्या हातात आदी घोषणा देत जनजागृती केली.

या हायस्कूलच्या विद्यार्थ्यांसह उपनिरिक्षक नंदगावे, कर्मचारी माळी यांचेसह आरएसपी समादेयक किशोर राठोड, मुख्याध्यापक रविंद्र ठाकूर, शिक्षक योगेश तांबोळी, संतोष ठाकूर, नरेंद्र पाटील, डी. व्ही. रसाळ, पी. पी. लोखंडे, संजय टिवळेकर, प्रमोद शिर्के आदींनी सहभाग घेतला.



इंदूर : न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताचा कर्णधार रोहित शर्मा आणि युवा फलंदाज शुभमन गिल यांनी शतकी खेळी केली. रोहित या शतकासह सचिन तेंडुलकर आणि विराट कोहली यांच्यानंतर सर्वाधिक आंतरराष्ट्रीय एकदिवसीय शतके झळकाविण्याच्या बाबतीत तिसऱ्या स्थानी पोहचला आहे. त्याने ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पॉँटिंगशी (३० शतके) बरोबरी केली, तर गिलचे गेल्या चार डावांतील हे तिसरे शतक. त्याने एकदिवसीय क्रिकेटमध्ये तीन सामन्यांच्या मालिकेत सर्वाधिक ३६० धावा करण्याच्या पाकिस्तानच्या बाबर आझमच्या विश्वविक्रमाशी बरोबरी केली आहे.

# भारतीय महिलांचा विंडीजवर विजय

## हरमनप्रीत-स्मृतीची दमदार खेळी

**लंडन : वृत्तसंस्था**

भारतीय महिला संघाने एप्रिल २०२३मध्ये दक्षिण आफ्रिकेत खेळल्या जाणाऱ्या महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी तयारी सुरू केली आहे. यासाठी संघ सध्या दक्षिण आफ्रिकेत आहे, जिथे तो तिरंगी मालिका खेळत आहे. या मालिकेत सोमवारी (दि. २३) भारताने वेस्ट इंडिजविरुद्ध ५६ धावांनी विजय मिळवून अंतिम फेरीतील स्थान निश्चित केले. आता भारताचा सामना द. आफ्रिकेशी होणार आहे.

या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रकृती अस्वास्थ्यामुळे हरमनप्रीत कौर पहिला सामना खेळू शकली नव्हती, पण तिने वेस्ट इंडिजविरुद्ध दमदार पुनरागमन केले. या सामन्यात संघाची सुरुवात संथ होती. १० षटके संपल्यानंतर



भारताला केवळ ६० धावा करताना दोन गडी गमावले होते. यानंतर कर्णधार हरमनप्रीत कौर आणि उपकर्णधार स्मृती मंधाना यांनी डाव सांभाळत हळूहळू वेग वाढवला. स्मृतीने ५१ चेंडूंत ७१ धावा केल्या. तिने या शानदार खेळीत १० चौकार लगावले आणि एक शानदार षटकारही लगावला. त्याचवेळी हरमनप्रीतने ३५ चेंडूंत ५६ धावा केल्या. तिने आपल्या डावात आठ चौकार लगावले. या दोघींनी मिळून भारताची धावसंख्या १६७ धावांवर नेली.

१६८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजची कर्णधार हेली मॅथ्यूज आणि शेमेन कॅम्पबेल यांनी मोठी भागीदारी केली. दोघींमध्ये ७१ धावांची भागीदारी झाली, मात्र भारताच्या तगड्या गोलंदाजीसमोर विंडीजच्या फलंदाजांना हात खोलून खेळता आले नाही. त्यामुळे वेस्ट इंडिजला २० षटकांत केवळ १११ धावा करता आल्या. भारताकडून दीप्ती शर्माने सर्वाधिक दोन विकेट घेतल्या, तर राजेश्वरी गायकवाड आणि राधा यादवने प्रत्येकी एक विकेट घेतली.

# क्रिकेट स्पर्धेत बोर्ली पंचतन संघ विजेता



**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील साळाव येथे डायमंड क्रिकेट क्लब आयोजित टेनिस बॉल मर्यादित षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत बोर्ली पंचतन येथील मुस्कार इलेव्हन संघ प्रथम क्रमांकाचा विजेता ठरला.

माऊ इलेव्हन नवगाव द्वितीय, साळबादेवी साळाव तृतीय व जय हनुमान सर्वे संघ चतुर्थ क्रमांकाचा मानकरी ठरला. स्पर्धेत मालिकावीर हुसैन (बोर्ली पंचतन), उत्कृष्ट फलदांज दिगंबर हमने (नवगाव), उत्कृष्ट गोलदांज अक्षय कांबळी (साळाव) ठरला. विजेते संघ आणि वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेत राम हाले व संतोष सुडकू यांनी पंचाचे, तर दरणे गुरुजींनी गुणलेखक म्हणून काम पाहिले.

# 'केबीपी'च्या सचिन गर्जेला सुवर्णपदक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या (केबीपी) सचिन गर्जे या विद्यार्थ्याने गोव्यातील मडगाव येथील मनोहर पर्रिकर स्टेडियममध्ये आयोजित सहाव्या फेडरेशन कप या राष्ट्रीय स्पर्धेत चमकदार कामगिरी केली. त्याने पिन्चॅक सिलॅट क्रीडा प्रकारात सुवर्ण व रौप्यपदक प्राप्त केले.

(छाया : महेंद्र खैरे)



सचिन गर्जे एसवाय बॅफ या वर्गात शिकत आहे. त्याने यापूर्वीही याच क्रीडा प्रकारात चमकदार कामगिरी करीत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शुभदा नायक, उपप्राचार्य प्रा. सी. डी. भोसले, डॉ. राजेश्री घोरपडे, तसेच प्राध्यापकांनी सचिनचे अभिनंदन केले. त्याला जिमखाना चेअरमन डॉ. अर्जून पोटिंदे, इन्चार्ज प्रा. भास्कर हनवटे यांचे मार्गदर्शन लाभले.

# राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेत मध्ये रेल्वेची गाडी विहंगने रोखली

**मुंबई : प्रतिनिधी**

परळच्या विद्यार्थी क्रीडा केंद्रातर्फे लाल मैदानात आयोजित निमंत्रित राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेत पुरुष गटात बलाढ्य मध्य रेल्वे संघाला ठाण्याच्या विहंग क्रीडा मंडळाने १२-१२ असे समान गुणांनी बरोबरीत रोखून त्यांना विजयापासून दूर ठेवले.

क गटातील या रंगतदार लढतात विश्रांतीला तीन गुणांची आघाडी घेणाऱ्या विहंगला त्या आघाडीचा फायदा मात्र घेता आला नाही. विहंगतर्फे लक्ष्मण गवस, आदित्य कांबळे, आकाश कदम यांनी शानदार अष्टपैलू खेळाची चमक दाखवली, तर आकाश साळवेने दोन्ही डावांत पळतीचा छान खेळ केला. मध्य रेल्वेतर्फे विजय हजारे, दिनेश मोरे, मिलिंद चावरेकर, उत्तम सावंत यांनी सुरेख अष्टपैलू खेळ केला. याच गटात आपल्या सलामीच्या लढतीत विहंगने आकाश साळवे, आकाश कदम, लक्ष्मण गवस, आदित्य कांबळे या चौघांच्या शानदार खेळाच्या जोरावर यजमान विद्यार्थी क्रिडा केंद्राला पाच गुणांनी सहज नमवले. विद्यार्थीतर्फे विश्वजित कांबळे, शुभम शिंदेची लढत एकाकी ठरली.

अ गटात आपला सलग दुसरा विजय मिळवताना पश्चिम रेल्वेने थरारक लढतीत कुपवाडच्या राणा प्रताप मंडळाचा एक गुणाने पराभव केला. विश्रांतीला एक गुणाची आघाडी रेल्वे संघाने घेतली होती. अष्टपैलू खेळ करणारे



प्रसाद राडीये, दीपक माधव, महेश शिंदे, मजहर जमादार त्यांच्या विजयाचे शिल्पकार ठरले. राणा प्रतापतर्फे सौरभ घाडगे, शनिराजे हारगे, काशीलिंग हिरेकुर्ब यांनी विजयासाठी जोरदार प्रयत्न केले. आपल्या सलामीच्या लढतीत या दोन्ही संघांनी नाशिकच्या संस्कृती क्रीडा मंडळाचा पराभव केला होता.

ड गटात उस्मानाबादच्या छत्रपती व्यायाम प्रसारक मंडळाने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचा एक डाव दोन गुणांनी दणदणीत पराभव करून आपला पहिला विजय मिळविला. निखिल मस्के, विजय शिंदे, अनिकेत पवार यांनी आक्रमण आणि संरक्षणात शानदार चमक दाखवून आपल्या संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली. सोहन गुंडने आक्रमणात चार गडी टिपले. पराभूत संघातर्फे प्रतिक वाईकर, मिलिंद बागवे छान खेळले. सलामीच्या सामन्यात छत्रपती व्यायाम प्रसारक मंडळाला महात्मा गांधीकडून हार खावी लागली होती.

क गटात मुंबई पोलिसांनी जोरदार विजयी सलामी देताना सोलापूरच्या उत्कर्ष क्रीडा मंडळाला १० गुणांनी आरामात नमवले. अक्षय निरगळ, सुनील मोरे, अक्षय खापरे, विशाल गायकवाड, मनोज वैद्य यांनी प्रेक्षणीय खेळ करून मुंबई पोलीस संघाला सहज विजय मिळवून दिला. उत्कर्षतर्फे निखिल कापरे, उबेर शेख, लक्ष्मण वाघमारे चमकले. सलामीच्या सामन्यात उत्कर्षला नव महाराष्ट्रकडून हार खावी लागली होती.

४ फूट ११ इंच या कुमार गटाच्या सामन्यात विहंगने दत्त सेवाचा, महात्मा गांधीने वैभवचा, नव शक्तीने ओम समर्थ भारत व्यायाम मंदिराचा, नंदादीपने श्री समर्थ व्यायाम मंदिराचा, ओम साईश्वरने ग्रिफिन जिमखान्याचा आणि फादर एग्नलने सरस्वती स्पोर्ट्स क्लबचा पराभव केला.

# मुंबईत राज्यस्तरीय पुरुष व्यावसायिक कबड्डी स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या प्रभादेवीतील ओम ज्ञानदीप क्रीडा मंडळाच्या वतीने आणि महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन व मुंबई शहर कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने २८ ते ३१ जानेवारी या कालावधीत व्यावसायिक पुरुष राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. वरळी स्पोर्ट्स क्लबच्या क्रीडांगणावर सायंकाळी ५ ते रात्री १० या वेळेत हे सामने रंगतील.

स्पर्धा मॅटवर खेळविण्यात येणार आहे. या स्पर्धेत मुंबई शहर, रायगड, ठाणे, पालघर, नाशिक, पुणे या जिल्ह्यातील व्यावसायिक संघांनी आपले प्रवेश निश्चित केला असून लवकरच या संघांची गट विभागणी करण्यात येईल. कबड्डीप्रेमींना प्रो-कबड्डीच्या नामवंत खेळाडूंचा खेळ जवळून पाहण्याची संधी आहे.

# पाचाड शाळेला क्रीडा साहित्य भेट

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगडच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड गावातील रा. जि. प. शाळेला कोकण इंडिया फाउंडेशनच्या वतीने क्रीडा साहित्य भेट देण्यात आले आहे.

पाचाड येथे आयोजित करण्यात या कार्यक्रमाला कोकण इंडिया फाउंडेशनच्या राजकुवर जाधवराव, मुख्याध्यापिका सुचिता गांगण, सीमा देशमुख, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष अश्विनी जाधव, ग्रामपंचायत सदस्य अनिकेत जाधव, अंगणवाडीसेविका गीता बेंदुगडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

कोकण इंडिया फाउंडेशन ग्रामीण भागांतील विद्यार्थी शिक्षणाबरोबर इतर क्षेत्रांतदेखील परिपूर्ण व्हावा



(छाया : महेश शिंदे)

यासाठी नेहमी प्रयत्नशील असते. त्याचाच एक भाग म्हणून पाचाड जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांना क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले. या मदतीबद्दल पाचाड ग्रामस्थांनी फाउंडेशनचे आभार मानले.

## महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा

# कोकण परिक्षेत्रीय कबड्डी संघाने पटकाविले विजेतेपद



**अलिबाग : प्रतिनिधी**

पुणे आयोजित करण्यात आलेल्या ३३व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धेत कोकण परिक्षेत्रीय कबड्डी संघाने विजेतेपद मिळविले. अंतिम फेरीत कोकण परिक्षेत्रीय कबड्डी संघाने कोल्हापूर परिक्षेत्रीय संघाचा ३६-२९ असा पराभव केला.

कर्णधार बिपिन थळे प्रशिक्षक प्रशांत मोकल यांच्या मार्गदर्शनाखाली कोकण परिक्षेत्रीय कबड्डी संघाने सुवर्णपदक प्राप्त केले. स्पर्धेत सागर सितारे, सुप्रेश म्हात्रे, चेतन म्हात्रे, रोहन गमरे, नामदेव इस्वालकर, विवेक भोईटे, प्रणित पाटील, अमोल नलावडे, चेतन वेळे, अमित राणे, कुणाल शिदे या खेळाडूंनी चांगला खेळ केला.

संघाचे सहाय्यक प्रशिक्षक नंदकिशोर पाटील, अमोल भोईटे, कल्पेश पाटील यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. पोलीस आयुक्त अतुल भारंबे, रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज शिरसाट, अतुल झेंडे यांनी विजेत्या कोकण परिक्षेत्रीय कबड्डी संघाचे अभिनंदन केले.

# फुटबॉल सामन्यात प्रथमच पांढऱ्या कार्डचा वापर

**लिस्बन : वृत्तसंस्था**

फुटबॉलमध्ये नियमभंगासाठी आतापर्यंत पंच पिवळे आणि लाल कार्ड वापरतात हे सर्वश्रुत होते, मात्र पंचांकडे एक पांढरे कार्डही असते, याची फार कोणाला कल्पना नाही. पंचांनी या पांढऱ्या कार्डचा वापर फुटबॉलमध्ये प्रथमच पोर्तुगाल येथील एका स्थानिक सामन्यात केला.

पोर्तुगालमधील महिला फुटबॉल लीगमधील बेन्फिका विरुद्ध स्पोर्टिंग लिस्बन या सामन्यात पंचांनी या पांढऱ्या कार्डचा वापर केला. फुटबॉलमध्ये कार्ड दाखवण्याची परंपरा १९७०च्या विश्वचषक स्पर्धेपासून सुरू झाली, पण पंचांनी पांढरे कार्ड वापरण्याची ही पहिलीच वेळ ठरली.

पोर्तुगालमध्ये सुरू असलेल्या महिला चषक स्पर्धेत पूर्वार्धाच्या अखेरीस हा प्रसंग घडला. स्टेडियममधील पहिल्या रांगेतील व्यक्तीला काही त्रास जाणवू लागल्याचे पंचांना जाणवले. मग दोन्ही संघातील डॉक्टरांनी खिलाडूवृत्तीचे दर्शन घडवताना पंचांच्या आदेशानंतर तातडीने स्टेडियममधील त्या अस्वस्थ चाहत्याच्या मदतीसाठी धाव घेतली. त्या वेळी पंचांनी दोन्ही संघांतील वैद्यकीय अधिकाऱ्यांना पांढरे कार्ड दाखवत त्यांच्या कृतीचे कौतुक केले.

खेळातील नैतिक मूल्य सुधारण्यासाठी आणि खिलाडूवृत्तीचे कौतुक करण्यासाठी सामन्यादरम्यान पंचांकडून पांढऱ्या कार्डचा वापर केला जातो. फुटबॉलची शिखर संघटना मानल्या जाणाऱ्या 'फिफा'नेच हे पांढरे कार्ड सादर करण्यास सुरुवात केली आहे. त्याचबरोबर 'कन्कशन'चा पर्यायही 'फिफा'ने मान्य केला आहे.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com